गुरुवार, ९ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी  दैनिक
वर्ष - ०३  अंक - ९४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 9 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-94 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# बळीराजाची दिवाळी गोड

## धनंजय मुंडे : पीकविम्याची अग्रीम रक्कम थेट खात्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यातील जवळपास सुमारे ३५ लाख शेतकऱ्यांसाठी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी ऐन दिवाळीच्या तोंडावर अत्यंत गोड बातमी दिली असून, राज्यातील पीक विमा कंपन्यांनी पहिल्या टप्प्यात सुमारे १७०० कोटी रुपये पीकविमा अग्रिम वितरण करण्यास मंजुरी दिली आहे. याचा लाभ राज्यातील विविध जिल्ह्यातील सुमारे ३५ लाख ८ हजार शेतकऱ्यांना मिळणार आहे. या विमा रक्कमा संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर थेट वितरण करण्यास संबंधित विमा कंपन्यांनी सुरुवात केली असल्याने बहुतांश ठिकाणी दिवाळी पूर्वीच पिकविम्याची अग्रीम रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.**





खरीप हंगामात वेगवेगळ्या जिल्ह्यात हवामानाच्या असमतोलामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. एक रुपयात पीकविमा योजनेमध्ये राज्यातील तब्बल १ कोटी ७१ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतलेला आहे. अंतरिम नुकसान भरपाई (MSA) अंतर्गत विविध जिल्हा प्रशासनाने संबंधित पीकविमा कंपन्यांना अधिसूचना निर्गमित करून २५ टक्के अग्रीम पीकविमा देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्यावरून बहुतांश कंपन्यानी विभागीय व राज्यस्तरावर अपील केलेले होते. अपिलांच्या सुनावण्या जसजशा होत गेल्या त्याप्रमाणे आतापर्यंत संबंधित विमा कंपन्यानी एकूण १७०० कोटी रुपये रक्कम देण्याचे मान्य केले आहे. तसेच जसजसे अपिलांचे निकाल येतील, त्यानुसार शेतकरी लाभार्थी संख्या व विम्याची अग्रीम रक्कम यामध्ये मोठी वाढ होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व प्रमुख पीकविमा कंपन्यांची धनंजय मुंडे यांनी बैठक घेऊन, अग्रीमचा तिढा तातडीने सोडवण्याबाबत विनंती केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित पीकविमा कंपन्यांच्या सुनावण्या तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले होते. त्याचबरोबर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हेही विम्याबाबत सातत्याने आग्रही होते. या सर्वांचेच धनंजय मुंडे यांनी आभार मानले आहेत. तसेच उर्वरित जिल्ह्यातील सर्वेक्षण, अपिलावरील सुनावण्या आदी बाबी तातडीने पूर्ण करण्याबाबत विभागाला सूचना केल्या आहेत.

### कोणत्या जिल्ह्यात किती पीकविमा मंजूर ?

**नाशिक :** शेतकरी लाभार्थी - ३ लाख ५० हजार (रक्कम - १५५ .७४ कोटी) **जळगाव :** १६,९२१ (रक्कम - ४ कोटी ८८ लाख) **अहमदनगर :** २,३१,८३१ (रक्कम - १६० कोटी २८ लाख) **सोलापूर :** १,८२,५३४ (रक्कम - १११ कोटी ४१ लाख) **सातारा :** ४०,४०६ (रक्कम - ६ कोटी ७४ लाख) **सांगली :** ९८,३७२ (रक्कम - २२ कोटी ४ लाख) **बीड :** ७,७०,५७४ (रक्कम - २४१ कोटी २१ लाख) **बुलडाणा :** ३६,३५८ (रक्कम - १८ कोटी ३९ लाख) **धाराशिव :** ४,९८,७२० (रक्कम - २१८ कोटी ८५ लाख) **अकोला :** १,७७,२५३ (रक्कम - ९७ कोटी २९ लाख) **कोल्हापूर :** २२८ (रक्कम - १३ लाख) **जालना :** ३,७०,६२५ (रक्कम - १६० कोटी ४८ लाख) **परभणी :** ४,४१,९७० (रक्कम - २०६ कोटी ११ लाख) नागपूर - ६३,४२२ (रक्कम - ५२ कोटी २१ लाख) **लातूर :** २,१९,५३५ (रक्कम - २४४ कोटी ८७ लाख) **अमरावती :** १०,२६५ (रक्कम - ८ लाख) **एकूण - लाभार्थी शेतकरी संख्या - ३५,८,३०३ (मंजूर रक्कम -१७०० कोटी ७३ लाख)**

# सरकारकडून तरूणांची फसवणूक : विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कंत्राटी भरती रद्द केल्याचा कांगावा सरकारने केला. परंतु त्यानंतर या कंत्राटी कंपन्यांना मुदतवाढ देऊन सरकारने बेरोजगार तरूणांची फसवणूक केली आहे. सरकारने तरूणांची फसवणूक थांबवावी. तरूणांच्या भावनांशी खेळू नये,अशा शब्दात विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला खडसावले आहे. राज्यातील रूग्णालयाची कामे देखील सरकार बाह्य यंत्रणेकडून करणार आहे. या कोट्यवधी रूपयांच्या कामांना एकत्रीत प्रशासकीय मान्यता देण्याचा पराक्रम सरकारने केला असून कंपन्यांचे खिसे भरण्यासाठी सरकारने आता कार्यक्रमच सुरू केला असल्याचा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला आहे. आज विधानभवन येथे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले, कंत्राटी भरती बंद केल्याचे शासनाने जाहीर केले. परंतु हे करत असताना राज्य शासनाने बेरोजगार तरूणांची दिशाभूल केल्याचे उघड झाले आहे. सरकारने कंत्राटी भरती करणाऱ्या कंपन्यांना नऊ महिन्याची मुदतवाढ दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे तरूणाईने या फसव्या सरकारवर विश्वास ठेवू नये.

# भेसळयुक्त खवा रोखण्यात प्रशासन अपयशी ?

## जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे यांना भेसळयुक्त खवा रोखण्याचे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे :** दिवाळी सणानिमित्त किराणा तसेच मिठाई व इतर बाजारपेठ विक्रीसाठी फुललेल्या आहेत. दिवाळी म्हटलं की गोड फराळाचे पदार्थ घरात बनवले जातात. याच अनुषंगाने राज्यासह जिल्ह्यामध्ये खवा तसेच मिठाई व्यवसाय तेजीत सुरू आहे. या सणाला खास करून मिठाई, खवा, बर्फी याला मोठ्या प्रमाणावर मागणी असते. नागरिकांमधून घरगुती गोड पदार्थ बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खवा खरेदी केला जातो. तर काही नागरिक वेळेच्या अडचणीमुळे किंवा इतर कामामुळे बाजारपेठेमधून तयार केलेले फराळाचे पदार्थ व मिठाई खरेदी करतात. यासाठी खवा मोठ्या प्रमाणावर लागतो. दिवाळीमध्ये सर्वात जास्त मागणी खवा आणि माव्यालाच असते.याच कालावधीत बाजारातील खव्याची वाढती मागणी लक्षात घेऊन काही खवा व्यापाऱ्यांकडून खवा व्यवसायामध्ये जास्तीच्या काही पैशाच्या हव्यासापोटी आपली प्रामाणिकता विकुन आपलेच नातेवाईक, मित्र, बहिण, सासू-सासरे, पाहुणे मंडळी यांच्या सुद्धा घरात हा भेसळीचा खवा जाणार आहे. याचे भान ही न ठेवता सरळ सरळ नागरिकांच्या आरोग्याचा बाजार मांडला आहे.

मिठाई आणि खव्या बरोबर रवा-मैदा-तेल-तूप यामध्येही भेसळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाची दिवाळी सुरक्षित साजरी करण्यासाठी अशी खरेदी करताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. दरम्यान, या अन्न पदार्थ भेसळीला रोखण्यासाठी,भेसळखोरांच्या मुसक्या आवळण्यासाठी दरवर्षी एफडीएकडून खास दिवाळीदरम्यान विशेष तपासणी मोहीम राबवली जाते. दोन दिवसावर येऊन ठेपलेल्या दिवाळी सणा च्या पार्श्वभूमीवर. यंदाही जिल्हाभरात या विशेष तपासणी मोहिमेला लवकरात लवकर सुरुवात करण्याची गरज आहे. खवा-मावा हा शेजारच्या गुजरात, कर्नाटक राज्यातून मोठ्या प्रमाणावर येतो. तर परराज्यातून येणारा हा खवा मावा सर्वाधिक असुरक्षित, भेसळयुक्त असतो. पर राज्यातून तसेच सातारा सांगलीकडून येणाऱ्या भेसळयुक्त खव्याचे हॉटस्पॉट ठिकाण हे कळंब तालुका असल्याबाबत नागरिकांमधून बोलले जात आहे. कळंब तालुक्यातील येरमाळा येथे खवा व्यवसायिकांचे मोठे आगार आहे. या अगोदर दोन वर्षांपूर्वी दिवाळी काळात येथील भेसळयुक्त खवा व्यवसायिकांच्या विरोधात एफडीएकडून नाम मात्र कारवाई करण्यात आली. तरीही जिल्ह्यात येणाऱ्या भेसळ युक्त खव्याला मात्र आळा बसला नाही.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त शिवकुमार कोडगिरे यांच्या मते बाजारपेठेमध्ये भेसळयुक्त खवा दाखल होताना रबडी नावाने दाखल होत असल्याने कारवाईस अडचण निर्माण होत आहे. तरीही भेसळयुक्त पदार्थावर अंकुश ठेवण्यासाठी जिल्ह्यामध्ये कारवाया सुरू आहेत. दस्तुर खुद्द जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनीही धाराशिव जिल्हाअधिकारी पदावर नियुक्त होताना पत्रकार परिषदेमध्ये धाराशिव जिल्ह्यातील भेसळयुक्त खवा रोखणे मोठे आव्हान असल्याचे वक्तव्य केले होते. बाजारपेठेत भेसळयुक्त खव्याने शिरकाव केल्याने ऐन दिवाळी व सणासुदीच्या काळात सुद्धा दर्जेदार खव्यावर मंदीचे सावट आहे.



विविध स्वीट मार्ट मध्ये दर्जेदार खव्याच्या तुलनेत भेसळयुक्त खवा हा अल्प दरात मिळत असल्याने आज छोटे व्यापारी हाच खवा विकत घेत आहेत . त्यामुळे दर्जेदार खव्याची मागणी कमी होत आहे यामुळेही खूप आर्थिक फटका बसत आहे .
**अमोल भारतराव कवडे,**
**खवा व्यावसायिक**



या वर्षाच्या दिवाळीत जिल्ह्यातील अनेक भागात विक्रीहोणारा भेसळयुक्त खवा थांबवण्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून तात्काळ छापे टाकून खव्यामध्ये होणारी भेसळ थांबून नागरिकांचे आरोग्य कायम निरोगी ठेवण्याचे कार्य करावे हाच जनसामान्यांचा मानस आहे . **सुंदर गायकवाड, खवा व्यावसायिक**













आधुनिक केसरी

आपल्या कुटुंबातील सर्व सदस्य, नातेवाईक, अर्थार्जनासाठी काम करतो त्या ठिकाणी समाजातील सर्व स्तरातील लोकांच्यात कर्तव्य दक्षतेने,प्रेमाने,सन्मानाने वागवले तर ते देवी मातेला जास्त प्रिय आहे. सत्कर्म करत रहाणे, मातेच्या आशीर्वाद रूप प्रसादाने सर्व भक्त अहोरात्र श्रदा धर्म कर्म आचरण करत असतात. त्यांची कर्तव्य क्षमता विषयाच्या प्रगाढविश्वासाने जागृत असते.त्यामुळे जीवन जगत असताना कसलेही भय वाटत नाही. मृत्यू चे भय न वाटता मोक्षाच्या दाराशी गेल्याचा आनंद मिळतो. असे अनेक लोक होऊन गेले आहेत व पुढेही होत रहाणार आहेत.कारण मातेचा आशिर्वाद सतत आमच्या कुटुंबाला असतो. हे दुर्गे ,देवी तुझे स्मरण केले तरी या जगातील जीवांची भीती नाहीशी होते. जे निर्भय आहेत त्यांनी स्मरण केले असता त्यांना प्रखर बुद्धिमत्ता व मांगल्य प्रदान करतेस.आमची गरीबी,संकटे नष्ट करण्यासाठी तुझ्या शिवाय दुसरा कोणताही आश्रय नाही. कारण तू अतिशय सहृद्य मनाची व परोपकारी माता आहेस. हे मोक्षदायिन्यै माते तुझा महिमा किती अगाध आहे , ज्या राक्षसांनी सतत सज्जनांचा अंतचं पाहिला त्यांना त्रास दिला . या त्यांच्या वागण्याने तर ते नरकात नरक यातना भोगायला लागतात हा तर सृष्टीचा नियम आहे. ते नरक कुंडात पापाचरण करत बसले असते पण ***माते त्यांना मरण पण तुझ्याकडून आले आता त्यांना स्वर्गाचे दार आपोआप उघडले, त्यामूळे राक्षस कुळाचा ऊध्दार झाला.हा ऐवढा मनाचा मोठेपणा तुझ्याजवळ आहे पापी लोकांना तुझ्या कृपेने भक्त आणि शत्रु ही दरी संपवली आहे .म्हणून "सर्व मंगल मांगल्ये माते, असे म्हणले जाते.असुरांना जेएका फुंकीत मारणे तुला सहज शक्य आहे,पण तू तसे केले नाहीस ,तर त्यांच्यावर शस्त्र चालवून त्यांनाही रणांगणात झुंझण्याची संधी दिलीस !! आपल्या शस्त्रांचा वापर करून शत्रुंना मरण देऊन त्यांना स्वर्गात स्थान व दिलेस.त्यामुळे मातेने भक्तांचेच नाही तर शत्रुंचे पण कल्याण कले आहे.






## आनंदी पहाट

## मानसिक अस्वस्थता टाळावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं हे सर्वस्वी आपल्याच मानसिकतेवर, अंतर्मनातील विचारांवर अवलंबून असतं. आपल्या अंतर्मनाला आनंदी ठेवण्यातच आपलं मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवता येतं. तो आनंद आपण स्वतःच निर्माण करायचा असतो. प्रत्येक व्यक्तीच्या आवडीप्रमाणे रंगाची पसंती केली जात असते. याचा प्रत्यय आपल्याला दैनंदिन जीवनात प्रत्येकाच्या पेहरावाच्या निवडीवरून दिसून येतो.
एखाद्याला एखाद्या दिवशी निळ्या रंगाचे कपडे वापरावेसे वाटतील तर दुसऱ्याला पिवळ्या रंगाचे. अर्थातच हे प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. आपल्या शारीरिक दुखण्यामागे खरं तर मानसिक अस्वस्थता कारणीभूत असते. रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग असे मोठे आजार अथवा डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ, चक्कर अशी छोटी दुखणी अनेकांना त्यांच्या मानसिकतेमुळे उद्‌भवलेली असतात. व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता हे देखील सर्व भिन्न असतं. ह्या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून सकारात्मकता, एकता निर्माण करावी लागत असते. ह्यामध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा कस लागत असतो. अंतर्मनाच्या, मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून रंग शास्त्राचा खूप मोलाचा वाटा असतो. रंगांचा संबंध थेट अंतर्मनाशी असतो. विविध रंग अंतर्मनाला जाऊन भिडणारे असतात. प्रत्येक रंगामुळे आपल्या अंतर्मनात निरनिराळे भाव प्रकट होत असतात. निरनिराळ्या रंगांमुळे निर्माण झालेल्या आपल्या भावना आपण उत्स्फूर्तपणे व्यक्त करत असतो. त्यामुळेच रंगशास्त्र आपल्या जीवनांत अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात. कोणत्या रंगाचा कोठे, कसा, किती, का, केव्हा वापर करायचा; हे पाहाणे अत्यंत आवश्यक असतं.



आधुनिक केसरी

## हरिचे भंजन | स्वानंदाचे ||

देहाच्या कुडीत | आत्म्यास कोंडले ||
मन स्वैर झाले | त्रिभुवनी ||१||
इंद्रियांचे सुख | मनाची लालसा ||
मिळे ठाव केसा | करंट्याशी (समाधानी) ||२||
विषयी गुंतला | दानवांचा साथी ||
पाप राशी माथी | रिचविल्या ||३||
बुध्दीचा अंकुश | लागता मनाला ||
सत्ता भ्रष्ठ झाला | विकारही ||४||
श्वासाच्या वारीशी | आत्म्याचे गुंजन ||
हरिचे भजन | स्वानंदाचे (मोक्ष लाभ) ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

क्षणभरी मातेस न देखे ।तरी आक्रंदें रुदन करी दुःखें ।
ते समई मातेसारिखें ।आणीक कांहिंच नाहीं ॥१०॥
आस करून वास पाहे ।मातेविण कदा न राहे ।
वियोग पळमात्र न साहे ।स्मरण जालियां नंतरें ॥११॥
जरी ब्रह्मादिक देव आले ।अथवा लक्ष्मीने अवलोकिलें ।
तरी न वचे बुझाविलें ।आपले मातेवांचुनी ॥१२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

सन्त कल्पतरु जानिये, मन वांछित फल पाय । अन्ध जीब पारख नहीं, हीरा हाथ नशाय ।।२५।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/२५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
संत जन कल्पतरु आहेत. त्यांना शरण जाऊन विवेक तथा शुद्ध श्रद्धेने ज्या इच्छा केल्या जातात ती सर्व फळे प्राप्त होतात. अज्ञानी जीव संतांना ओळखत नाहीत. ते जवळ असूनही आपल्या अज्ञानाने संतरुपी हिऱ्यास हातून घालवतात.

.....................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

पुष्प ५१वे

आधुनिक केसरी




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

कर्माचा अधिकार ज्यांना नाही ।रामनाम
"हे साधन, सांगणे त्यांना ठीक नाही ।
वैदिक कर्म केल्यावाचून चित्तशुद्धी नाही।
मांडीती मत वृंद सारे ।। १ ।।श्रीमहाराज
उत्तर देण्या उठले ।उपस्थितांना सांगु
लागले ।कर्ममार्गी चालता नामा संगे भले
।जाई गळुनी कर्म, शिल्लक उरे नाम हे ।।
२ ।।सभेतला एकजण उभा राही ।म्हणे
" राम" हा मंत्रच शास्त्रीय नाही ।ऐकुनी हे
श्री महाराजांना रहावले नाही ।म्हणती-
ऐका, सांगतो हा सिद्ध मंत्र कसा ? ।। ३ ।।
म्हणती महाराज, रामनाम अग्नी, देह बुद्धी
जाळे ।विरुनी जाते मनातले संशयाचे
जाळे ।दूर ठेवी कळी-काळे ।"रामनाम"
सिद्ध मंत्र हा ।।४ ।। अखंड रामनाम घ्यावे
।नामानुसंधान असू द्यावे ।भगवंतास
त्या आणावे ।मनाच्या जवळी ।। ५ ।।
ओंकाराचे स्वरूप हे रामनाम ।सर्व कर्मांचा
प्राण रामनाम ।जन हो स्वानुभव माझा
रामनाम ।अनुभवा तुम्ही रामनाम ।।६।।

## कोणत्याही परिस्थितीत वृत्ती स्थिर ठेवावी

आधुनिक केसरी

अमानित्व हा देहाचा धर्म आहे. दुसऱ्याचा मोठेपणा राखून आपला मोठेपणा वाढवावा. दंभ हा मनाचा धर्म आहे. तो दुसऱ्याला फसविण्याकरिता नसावा. स्वतःचे कल्याण करून घेण्यापुरताच दंभ असल्यास हरकत नाही. अहिंसा हा देहाचा धर्म आहे. अहिंसा ही हेतूवर अवलंबून असते. वाचेने कोणाचे मन दुखवू नये, आणि देहाने परपीडा करू नये. दुसऱ्याचे दोष सांगणे हे हीनपणाचे लक्षण आहे. लौकिकातला मोठेपणा एका जन्माचा घात करतो, पण दंभ आणि हिंसा अनेक जन्माचा घात करतात. द्वेषामुळे हिंसा घडते, म्हणून आपण कोणाचाही द्वेष करू नये. कामक्रोधादि सर्वच विकार भगवंताच्या आड येतात, पण वैर आणि द्वेष यांसारखा नाश करणारा शत्रू नाही. स्वार्थामुळे द्वेष घडतो. स्वार्थ जायला नामासारखे दुसरे साधन नाही.
आपली वाचा दुसऱ्याला शिकविण्यासाठी आणि मोठेपणासाठी नाही. वाचेने म्हणजे जिभेने बोलता येते आणि खाता येते. नेहमी सत्य आणि गोड बोलावे, आणि खाण्याच्या बाबतीत जीभ आपल्या ताब्यात ठेवावी.



स्वतःची चित्तशुद्धी करून घेऊन, संतांचे गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. अभिमानाचे विष जिथे येते, तिथे नामाची आठवण ठेवावी. हिरण्यकश्यपूच्या ठिकाणी देखील भगवंत नव्हता असे नाही; पण कुंपण फार वाढल्याने शेत दिसेनासे व्हावे, तसे हिरण्यकश्यपूचे झाले. स्वतःच्या ठिकाणी भगवंत आहे हे हिरण्यकश्यपू अभिमानाने विसरला. त्यामुळे भगवंताला खांबात दिसावे लागले. अभिमान जरूरीपुरताच ठेवावा. 'मी रामाचा आहे' असा अभिमान धरावा. नामाची कास धरावी. 'नारायणाचे दर्शन व्हावे' असे नाही प्रल्हाद म्हणाला, 'नाम सोडणार नाही' असे म्हणाला. लहानपणाची वृत्ती चांगली असते. लहानपणात चूक नाहीच, आणि सगळा फायदाच असतो. भगवंताजवळ आपण लहान मूल झाल्याशिवाय त्याला कृपेचा पान्हा फुटायचा नाही; म्हणून आपण भगवंतापाशी लहान व्हावे. लहानपण हे वयावर अवलंबून नसून आपल्या वृत्तीवर अवलंबून असते. कोणाविषयीही वाईट विचार मनात आणू नयेत; त्यापासून आपलेच मन गढूळ होते. 'माझा प्रपंच जसा व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर मला पडू देऊ नकोस,' असे परमेश्वराला अनन्यतेने म्हणावे. मला खात्री आहे, तो तुमच्या साहाय्याला आल्यावाचून राहणार नाही.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी



चिंता करितो विश्वाची" असे उत्तर त्याने दिले होते. या मुलाला संसारांत अडकविले, तर तो ताळ्यावर येईल या कल्पनेने त्याचे वयाच्या १२व्या वर्षी लग्न ठरविण्यात आले. लग्न-समारंभात पुरोहितांनी "सावधान" हा शब्द उच्चारताच तो ऐकून, नेसलेले एक व अंगावरील पांघरलेले दुसरे, अशा दोन वस्त्रांनिशी नारायण लग्नमंडपातून पळाले. लोकांनी पाठलाग केला. पण त्यांनी तातडी करून गांवाबाहेरची नदी गाठली आणि नदीच्या खोल डोहात उडी मारली.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, ९ नोव्हेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


## विद्यार्थ्यांनी फक्त अभ्यासासाठीच मोबाईलचा वापर करावा : डॉ.प्रतापसिंह पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** विद्यार्थ्यांनी विषयाचा सखोल अभ्यास करताना हातातील मोबाईलमधील माहिती, कौशल्य व तंत्रज्ञानाचा फक्त अभ्यासासाठीच वापर करून आपले भवितव्य उज्वल करावे असे प्रतिपादन डॉ.प्रतापसिंह पाटील यांनी केले. ते वेद शैक्षणिक संकुल येथे भैरवनाथ अध्यापक विद्यालय व भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील नवागत विद्यार्थी स्वागत, गुणवंत विद्यार्थी सत्कार व पालक मेळावा प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी शिवसेवा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सहसचिव प्रा.संजय घुले व सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उपप्रचार्या प्रा.डॉ.मिनाक्षी भवर,भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतिश मातने हे प्रमुख पाहुणे म्हणून होते.
पुढे बोलताना डॉक्टर प्रतापसिंह पाटील यांनी मोबाईलचे फायदे व तोटे सांगत नवीन विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कौशल्य प्राप्त करावे आणि जीवनात यश मिळवावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वीजतंत्रीमधील प्रथम आशिष आवाड, द्वितीय गोविंद वावरे, तृतीय अमर काळे, तआरतंत्रईमधील प्रथम श्रीकांत धाकतोडे, द्वितीय प्रितम हिंगे, तृतीय आदित्य गाडे, वेल्डर प्रथम सोनी भांडे, द्वितीय तुकाराम मिरगणे, तृतीय प्रतापसिंह मुंडे तर कोपामधील प्रथम अभिषेक कळेकर, द्वितीय उत्कर्ष गरड, तृतीय राणी काळे, अंकिता सुरवसे व रूपाली सोनवणे या गुणवंत प्रशिक्षणार्थींचा तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने आयोजित केलेल्या रण फॉर स्किल मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम विकास वावरे द्वितीय प्रितम हिंगे आल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीकांत पवार यांनी केले तर प्रास्ताविक प्राचार्य सूरज भांडे व आभार निदेशिका कल्याणी भराटे यांनी मानले. या कार्यक्रमास सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अविनाश घोडके, प्रा.मोहिनी शिंदे, निदेशक अविनाश म्हेत्रे, निदेशक सागर पालके,निदेशक विनोद जाधव, निदेशिका कोमल मगर,लिपिक आदित्य गायकवाड, सेवक विनोद कसबे व ढमाले ताई यांच्यासह पालक व सर्व प्रशिक्षणार्थींची उपस्थिती होती.




आजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील नकारात्मक विचार काढून सकारात्मक विचार केल्यास यश प्राप्त करणे अवघड नाही – प्रा .संजय घुले
विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत जागरूक पालक व शिक्षकांनी महत्वाची भूमिका बजावून आपले कर्तव्य पार पाडावे .विद्यार्थी दशेत चौफेर विकास स्वत :चा करून घेतला तर आयुष्य सुखमय होते . **प्रा .डॉ .मिनाक्षी शिंदे– भवर**




# सातव्या वेतन आयोगाची थकबाकी सात वर्षानंतरही मिळाली नाही

## काळ्या फीती लावून केला शासनाचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ अधिकारी व कर्मचारी यांना 1/1/2016 ते 30/6/2021 या कालावधीची सातव्या वेतन आयोगाची थकबाकी न मिळाल्याने महामंडळ अधिकारी व कर्मचारी संघटनेने काळ्या फीत लावून शासनाचा निषेध केला तर 1/12/2023 पासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसह अन्न त्याग आंदोलन करण्याचा ईशाराही शासनाला देण्यात आला आहे. 6 ते 8 नोव्हेंबरपर्यंत काळ्या फीत लावून लक्षवेधी आंदोलन करणार्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळाचे अध्यक्ष सुधीर मुनगंटीवार हे न्याय मिळवून देतील का असा प्रश्न त्यांच्याच जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी आंदोलनादरम्यान विचारला आहे. महाराष्ट्राचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हेच महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यामुळेच महामंडळ कर्मचाऱ्यांनी त्यांची वारंवार भेट घेऊन ही मागणी लावून धरली आहे. पण तरी सुद्धा सात वर्षांपासून थकबाकीची रक्कम न मिळाल्याने कर्मचाऱ्यांवर आंदोलनाची वेळ आली असल्याची खंत कर्मचाऱ्यांनी बोलून दाखविली. राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याची आवश्यकता नसून महामंडळ स्वबळावर सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यास सक्षम असल्याचे व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांनी शासनास कळविले आहे. याच विषयावर योग्य व लवकर निर्णय व्हावा म्हणून मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली होती . महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या उपसमितीचे अध्यक्ष असून सुधीर मुनगंटीवार हे स्वतः महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळाचे अध्यक्ष आहेत. परंतू समिती स्थापन झाल्यापासून आजपर्यंत या उपसमितीची साधी एक बैठक सुद्धा झालेली नाही. स्वतः उपमुख्यमंत्री व वनमंत्री हेच या विषयावर निर्णय घेणार आहेत. असे असतांनाही आणि महामंडळ सतत नफ्यात असतांनाही अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी न मिळाल्याने ऐन दिवाळीच्या तोंडावर कर्मचाऱ्यांनी तीन दिवस काळ्या फीत लावून लक्षवेधी आंदोलन सुरु केले आहे. तर 1 डिसेंबर 2023 पासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसह अन्न त्याग आंदोलनाचा ईशाराही दिला आहे.

### महत्त्वाची बातमी

## मध्य रेल्वेची वाहतूक खोळंबली, प्रवाशांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ऐन गर्दीच्या वेळी मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे कामावरून घरी परतणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत. लोकल विस्कळीत झाल्याने रेल्वे स्थानकात गर्दी उसळली आहे. मध्य रेल्वेकडून याबाबत कोणतीही माहिती दिली जात नसल्याने प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे.
ठाण्यातील कळवा स्थानकाजवळ ओव्हर हेड वायर तुटल्याने लोकल वाहतुकीवर परिणाम झाला आहे. दुपारी दोन-अडीच वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाल्याची माहिती आहे. सायंकाळपर्यंत मध्य रेल्वे अजूनही विस्कळीत आहे. गोरखपुर एक्सप्रेस आणि बदलापूर लोकल डाऊन फास्ट ट्रॅकवर रखडली आहे. बिघाड दुरुस्तीचे काम अजूनही सुरूच असून त्यामुळे कल्याण दिशेने जाणारी सर्व लोकल एक्सप्रेस स्लो मार्गावरून वळवल्या आहेत. कळवा रेल्वे स्थानकाच्या काही अंतरावर पारसिक बोगद्याच्या ठिकाणी ओव्हरहेड वायर तुटली आहे. त्यामुळे कर्जत-कसाराकडे जाणाऱ्या जलद मार्गावरील लोकल वाहतूक खोळंबली आहे. यामुळे जलद मार्गावरील लांब पल्ल्याच्या आणि लोकल ट्रेनला मोठा फटका बसला आहे. गेल्या दोन तासांपासून वाहतुकीवर परिणाम झाला आहे. ठाण्यावरून कर्जत कसाराकडे जाण्याऱ्या लोकल धीम्या मार्गावरून वळवण्यात आल्या आहेत. लोकल ट्रेन या जवळपास 20 ते 30 मिनिटे उशिराने धावत असल्याची माहिती आहे. ऐन गर्दीच्या वेळी लोकल वाहतूक विस्कळीत झाली असल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. मध्य रेल्वेकडून याबाबत प्रसारमाध्यमांनादेखील माहिती देण्यात आली नाही. त्याशिवाय, ट्वीटरवरही कोणतीही माहिती देण्यात आली नाही. मध्य रेल्वेने शेवटचे ट्वीट हे दुपारी 1.12 वाजण्याच्या सुमारास केले आहे. या ट्वीटमध्ये दिवाळी, छठ पूजा निमित्ताने चालवण्यात येणाऱ्या साईनगर शिर्डी ते बिकानेर दरम्यानच्या विशेष ट्रेनची माहिती देण्यात आली आहे. मध्य रेल्वेकडून याबाबत अधिक स्पष्टपणे माहिती देण्यात येत नसल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# कारागृह पोलिसांना दोन हजारांची लाच भोवली!

## महिला कारागृह पोलिसांसोबत इतर पोलीस कर्मचारी अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा कारागृह, जळगाव येथील भिमा उखडु भिल, सुभेदार तसेच पुजा सोपान सोनवणे, व हेमलता गयबु पाटील, महिला कारागृह पोलीस यांनी तक्रारदार यांचेकडून २,०००/- रु लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम महिला कारागृह पोलीस हेमलता पाटील यांचे हस्ते स्विकारतानां रंगेहाथ पकडल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार या एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत असलेल्या पहुर येथील अंगणवाडीत अंगणवाडी शिक्षिका म्हणुन कार्यरत असून त्यांच्या मुला विरुद्ध जिल्हा पेठ पो.स्टे. जळगांव, येथे भा. द. वि. कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयांत त्यास अटक करण्यात येवून तो सध्या जिल्हा कारागृह, जळगांव येथे न्यायालयीन कोठडीत आहे. तक्रारदार त्याचे मुलास वेळोवेळी भेटण्याकरीता, जिल्हा कारागृह, जळगाव येथे गेले असता तेव्हा तेथे ड्युटीवर असलेले सुभेदार भिमा भिल, कारागृह पोलीस पुजा सोनवणे, हेमलता पाटील, अनंत केंद्रेकर व परशुराम काळे तसेच वेळोवेळी ड्युटीवरील इतर कर्मचारी हे त्याचेकडून त्यांच्या मुलाची भेट घडवून आणण्यासाठी प्रत्येक वेळी २,०००/- रु मागणी



करीत असत. तक्रारदार यांची त्यांना पैसे देण्या इतकी आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने तक्रारदार यांनी दि ०७.११.२०२३ रोजी त्याचेविरुध्द कारवाई होणेकरीता, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे यांचेकडे लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा कारागृह, जळगांव येथे जावून पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान महिला कारागृह पोलीस पुजा सोनवणे व हेमलता पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या मुलाची कारागृहात भेट करुन देण्यासाठी २,०००/- रु लाचेची मागणी करून भिमा उखडु भिल, सुभेदार यांनी तक्रारदार यांना सदर लाचेची रक्कम महिला कारागृह पोलीस हेमलता पाटील यांच्याकडे देण्यास सांगून महिला कारागृह पोलीस हेमलता पाटील यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द जिल्हा पेठ पो.स्टे जि. धुळे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कलमान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक धुळे विभागाचे पोलीस उप अधीक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी तसेच पथकातील राजन कदम, मुकेश अहिरे, रामदास बारेला, संतोष पावरा, मकरंद पाटील, प्रशांत बागुल, प्रविण मोरे, प्रविण पाटील, सुधीर मोरे या पथकाने केली आहे.
सदर कारवाईस नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व वाचक पोलीस अधीक्षक नरेंद्र पवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

# मोदींची टीका

आधुनिक केसरी

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मंगळवारी (७ नोव्हेंबर) विधानसभेत लोकसंख्या नियंत्रणावर बोलत असताना मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित केली. यावेळी त्यांनी एक विचित्र टिप्पणी केली. ज्यामुळे सभागृहात उपस्थित असलेल्या महिला आमदार खाजिल झाल्या, तर पुरुष आमदारांमध्ये कुजबुज सुरू झाली. नितीश कुमार यांच्या विचित्र वक्तव्यामुळे विरोधी पक्षांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. नितीश कुमार म्हणाले, पुरुष रोज रात्री पत्नीशी संबंध निर्माण करतात. यामुळे मूल जन्माला येते. परंतु, मुली साक्षर असतील तर प्रजनन दर घसरतो. मुलगी सुशिक्षित असेल तर प्रजनन दर सरासरी दोन टक्क्यांपर्यंत खाली येतो आणि जर तिने शालेय शिक्षण पूर्ण केले असेल तर प्रजनन दर राष्ट्रीय स्तरावर १.७ टक्क्यांपर्यंत खाली येतो. नितीश कुमार पुढे लैंगिक शिक्षणावरही बोलले. लैंगिक शिक्षणावर बोलताना त्यांनी प्रजनन दर कसा कमी होतो यावरही भाष्य केले. परंतु, ते वक्तव्य किळसवाणं होते, असा आरोप विरोधक करत आहेत. या वक्तव्यानंतर नितीश कुमार यांच्यावर विरोधक टीका करत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील यावर भाष्य केले आहे. त्यांनी नितीश कुमार यांचे नाव न घेता इंडिया आघाडीवर टीका केली आहे. पंतप्रधान बुधवारी (८ नोव्हेंबर) मध्य प्रदेशमध्ये भाजपाच्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, इंडी अलायन्सचे लोक सध्या भारतातलं विद्यमान सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार पाडण्याच्या गप्पा मारत आहेत. त्यांच्यातला एक नेता जो इंडी अलायन्सचा झेंडा घेऊन फिरतोय, त्याने काल माता-भगिनींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. त्या नेत्याने भर विधानसभेत, जिथे माता-भगिनीही उपस्थित होत्या, तिथेच घाणेरडे वक्तव्य केले. नरेंद्र मोदी म्हणाले, कोणी कल्पना करणार नाही, अशा पद्धतीचे ते वक्तव्य होते. त्यांना कसलीच शरम नाही. हा सगळा प्रकार एवढ्यावरच थांबला नाही. त्या नेत्याच्या वक्तव्यानंतर त्यांच्या आघाडीतला एकही नेता माता-भगिनींबाबतच्या आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात, त्यांच्या भयंकर अपमानाविरोधात एक शब्द बोलण्यास तयार नाही. जे लोक माता-भगिनींप्रती असा विचार करत असतील ते तुमचे काय भले करणार? हे लोक तुमची आब्रू वाचवू शकतात का? तुमचा सन्मान करू शकतात का? आपल्या देशाचे किती मोठे दुर्दैव आहे बघा. पंतप्रधान म्हणाले, तुम्ही (इंडिया आघाडी) अजून किती खाली जाणार आहात? जगभरात आपल्या देशाला अजून किती अपमानित करणार आहात? मी आज देशातल्या सर्व माता-भगिनींना सांगतो की तुमच्यासाठी, तुमच्या सन्मानासाठी माझ्याकडून शक्य होईल ते सगळे मी करेन. मी मागे हटणार नाही.

# माणसाला सन्मान देणारे महान संविधान



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**संविधानापुर्वी देशात मनुस्मृती नुसार कायदे होते म्हणून हजारो वर्षांपासून माणसाला माणसापासून दुर केले, माणसाने माणसाला हिन व तुच्छ लेखुन स्वतः ला इतरांना पेक्षा श्रेष्ठ लेखण्याची व माणुसकी ला काळीमा फासणारी संस्कृती येथे होते. कुत्र्या मांजराला घरा वावर होता पण माणसाला गाव बंदी होती, गावात राहणाऱ्यांना मनुस्मृती विरूद्ध बोलण्याचे वागण्याचे स्वातंत्र्य नव्हते. केवळ सेवा करून एकाच वर्णाचे श्रेष्ठत्व मान्य करायचे व स्वतः कमवलेले दान दक्षीणा स्वरूपात देऊन मोकळे व्हायचे. देशात ब्रिटिश आले ब्रिटिशांच्या येण्याने शिक्षण, राजकारण व नोकरी मध्ये हजारो वर्षांपासून हक्क अधिकार नाकारून माणसिक गुलाम बनवलेल्या लोकांना स्थान मिळाले परंतु सामाजिक पातळीवर मात्र मनुचेच कायदे अस्तित्वात होते.**

परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जगातील एकमेव श्रेष्ठ संविधान निर्माण केले व सर्वात अगोदर मनुस्मृती ने प्रस्थापित केलेली विषमता, अस्पृश्यता व भेदभाव बाजूला सारून प्रत्येक माणासाला सारखे केले. मनुस्मृती ने चार वर्ण तयार करून त्यांची कामे वाटून दिली व एका वर्णातुन दूसऱ्या वर्णात जाण्याचे सर्व रस्ते बंध करून दिलेल्या कामाला च धर्म मानून धर्माचे पालन करणे हेच पुण्याचे काम समजून माणसाला मर्यादित, गुलाम करून एकप्रकारे माणसाचे अस्तित्व च नाकारले. परंतु हजारो वर्षांपासून चालत आलेल्या या व्यवस्थेला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून उलथून टाकून प्रत्येक माणसाला समान केले. भारतीय संविधान कलम १४ नुसार समतेचा अधिकार बहाल केला आणि धर्म, वंश, लिंग, जात किंवा जन्मस्थान यावरून कोणताही भेद करता येणार अशी तरतुद केली. म्हणजे आता वर्णव्यवस्था नसुन प्रत्येक जन माणूस म्हणून जगेल व सारख्या च प्रमाने सर्वांना महत्त्व राहील. कोणीही श्रेष्ठ कनिष्ठ राहणार नाही. म्हणजेच कायदा प्रत्येकाचे समान संरक्षण करेल. हजारो वर्षांपासून स्वतः चे वर्चस्व स्वतः सांगणाऱ्यांना, व इतरांना तुच्छ लेखणाऱ्यांना या कलमामुळे धक्काच बसला. कारण मनुस्मृती नुसार चार वर्ण समप्रमाणात कधीच येऊ शकत नव्हते. प्रत्येकाला काही मर्यादा होत्या परंतु संविधानाने सर्व तोडून, वर्णव्यवस्था गाडून मानसाला महत्त्व निर्माण करून दिले. पुढे कलम क्रमांक १५ मध्ये राज्य कोणत्याही नागरिकांशी धर्म,जात,वंश,लिंग व जन्मस्थान यावरून भेदभाव करणार नाही. थोडक्यात काय तर जात धर्म लिंग वंश बघून कोणत्याही सरकारला कोणतीही बाब नाकारून लोकांना वंचित ठेवता येणार नाही. कलम क्रमांक १७ नुसार कोणत्याही नोकरी मध्ये वरील बाबीचा विचार करून नोकरी नाकारता येणार नाही. कारण संविधानापुर्वी ब्रिटिश राजवट वगळता मोक्याच्या ठिकाणी एकाच वर्णाचे वर्चस्व होते. हे वर्चस्व कलम क्रमांक १६ ने नष्ट करून माणसाला प्राधान्य दिले. कलम क्रमांक १७ नुसार अस्पृश्यता निवारण करून समतेची क्रांती केली. कलम क्रमांक १४,१५,१६ मध्ये माणसाला समता प्रस्थापित करून दिलीच. परंतु वर्णव्यवस्थेमधुन पुढे निर्माण झालेली अस्पृश्यता नष्ट करणेही गरजेचे होते. कारण मनुस्मृती नुसार माणसाच्या स्पर्शाने काही लोक बाटायचे. आता कलम १७ नुसार बाटणारे लोक पवित्र करण्याचे काम केले. आणि कलम क्रमांक१७ असताना एखादा व्यक्ती स्पर्शाने बाटलाच तर बाटणाऱ्याला शिक्षा होते. म्हणजे अस्पृश्यता निर्मूलन कलम १७ ने केले आहे. आता काही लोकांना प्रश्न पडला असेल कलम १४-१६ तिन कलमांनुसार धर्म, जात, वंश लिंग व जन्मस्थान वरून भेद करताच येत नव्हता तळ मग कलम क्रमांक १७ हे घेण्यामागचे मुळ कारण काय तर. थोडक्यात सांगायचे झाल्यास भारत जातीप्रधान आहे. म्हणुन प्रत्येक जात एकमेकांना उच्च निच समजत असते. जाती जातीतील लोकांनी भेद करू नये जसे बामणांनी मराठा, जाट, राजपूत यांना कमी लेखु नये मराठ्यांनी कुणबी, तेली,माळी साळी, कुंभार धनगर यांना कमी लेखु नये व अशा प्रकारची विषमता राहुच नये म्हणून १४-१६ कलम आणि ज्यांना अस्पृश्य समजून गावाबाहेर ठेवले मांग, महार चांभार, भंगी अशा जाती साठी कलम क्रमांक १७ हि गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कलम क्रमांक १८ नुसार लष्करी व शैक्षणिक पदव्या वगळून इतर सर्व पदव्या बंद केल्या जसे अनेकांना पुर्वी वेगवेगळ्या पदव्या देऊन त्या पदव्याच्या आधारे त्या व्यक्तीला वेगळे स्थान दिले जायचे. परंतु कलम १८  नुसार सर्व पदव्यावर बंधी घालून सर्व माणसे समान आहेत. केवळ सैन्यात मिळालेल्या पदव्या व शैक्षणिक क्षेत्रात मिळालेल्या पदव्याच वापरण्याचा अधिकार मिळाला. म्हणजे हजारो वर्षांपासून माणसा माणसात फुट पाडून त्यांना जवळ येऊ दिले जात नव्हते. एकमेकांना माणूस म्हणून न बघता केवळ त्यांचा वापर करून त्यांचे माणसिक व शारीरिक शोषण केले जायचे अशा लोकांना भारतीय संविधानाने माणुन तर बनवले परंतु माणसाचे अस्तित्व कायम रहावे म्हणुन संरक्षण केले. मनुस्मृती नुसार वेद स्मृती हेच सर्वश्रेष्ठ आहे. स्मृती ने निर्माण केलेले वर्ण व वर्णानुसार वाटून दिलेले काम प्रत्येकाने करायला पाहिजे. मनुस्मृती व त्यामध्ये लिहलेले याविरोधात कोणीही काहीच बोलु नये. जो मनुस्मृती व ब्राम्हणाच्या विरोधात बोलेल तो शुद्र समजला जाईल असे निर्बंध लादले. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कलम क्रमांक १९ नुसार देशातील प्रत्येक नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देऊन बोलण्याचा, व्यक्त होण्याचा, मत मांडण्याचा अधिकार दिला. त्यामुळे देशातील प्रत्येक नागरिक बोलायला लागला, वेगवेगळ्या माध्यमातून आपले मत मांडायला लागला. आणि हीच गोष्ट विषमतावादी व्यवस्था चालवणाऱ्याच्या जिव्हारी लागली. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सुरवातीलाच विषमता वादी व्यवस्था उखडून समतावादी व्यवस्था प्रस्थापित करून त्याचे संरक्षण केल्याने मनुस्मृती नुसार चालणाऱ्यांचा धर्म धोक्यात आला. कारण हजारो वर्षांपासून जे नाकारले होते स्वातंत्र्य कलम क्रमांक १९-२२ ने देशातील प्रत्येक माणसाला बहाल केले. पुढे संविधानाचे कलम २३ते २४ मध्ये शोषणा विरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार मिळाला. जाती प्रधान देशात अनेकांचे हक्क अधिकार नाकारले गेले म्हणून मुलभूत गरजा ही पुर्ण करणे अनेकांकडून शक्य होत नव्हते म्हणून तर इतिहासात आपण बघितले तर पडेल ती कामे माणसाकडून करून घेतली जात. व मोबदल्यात एक वेळचे जेवण, शिळी भाकरी, किंवा खाऊन उरलेले अन्न दिले जायचे. अर्थात स्वरूप बदलून हे प्रत्येक जातीधर्मात होते. अशा प्रथा रुढी बंद करण्याचे काम कलम २३, २४ ने केले. वेठबिगारीच्या नावाखाली मोजकाच मोबदला देऊन त्यांच्या कडून अनेक काम करून पशुप्रमाने वागणूक दिली जात होती. प्रत्येक माणसाला जिव असतो, मान सन्मान असतो हे विसरून जाउन पशुप्रमाने महिला व पुरुषांचे शोषण केले जायचे याला संविधाने आळा घातला. पुढे कलम क्रमांक २५-२८ धार्मिक स्वातंत्र्य बहाल करून प्रत्येक व्यक्तीला आपल्याला धर्माचे पालन करणे, उपासना करणे, धार्मिक कार्यक्रमाला हजर राहणे, धार्मिक कार्यासाठी निधी देण्याचे हक्क संविधानाचे बहाल केले. त्या अगोदर फक्त दान दक्षिणा ब्राम्हणांना देण्याचा अधिकार होता. संविधानाने दान दक्षिणा, धार्मिक कार्यासाठी निधि देण्याचा अधिकार दिला परंतु तो द्यायलाच पाहिजे यावर बंधन घातले नाही. थोडक्यात आपल्या मर्जीने लोक धर्माचे पालन करून धर्माचा प्रचार प्रसार वैयक्तिक पातळीवर करू शकतात. वरिल बाबीचा विचार केला तर संविधानाने माणसाला माणसातच आणले नाही तर त्यांचे अस्तित्व निर्माण करून त्यांना संरक्षण देऊन मान सन्मान तर दिलाच परंतु सर्वांना समान केले आणि येथेच मनुस्मृती चे कायदेशीर अस्तित्व संपुष्टात आले. परंतु वैयक्तीक पातळीवर मनुस्मृती ला माणणारे लोक आजही जे लोक अंधविश्वास, पाखंड व धर्माच्या नावाखाली एकत्र येतात त्यांना संविधान कळूच नये म्हणून इतर कामात व्यस्त करून संविधानाबद्दल दिशाभूल करणारी माहिती देतात. आणि स्वतःला गुणवंत व आभ्यासु, ज्ञानी समजणाऱ्यांना अजून संविधानाचे महत्त्व व गांभीर्य कळत नसेल तर त्याला गुणवंत वा शिक्षीत कसे म्हणावे. हजारो वर्षांपासून गुलामीत खितपत पडलेल्या लोकांना माणसात आणणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर एका जातीचे उद्धाते आणि संविधान एका जातीची संपती असे वाटत असेल तर अशा विचारांच्या लोकांना कोणत्या शब्दात बोलुन त्यांचा सन्मान करावा? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणसात आणुन माणसिक गुलामीतुन मुक्त केले तरीही लोकांना संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कळत नसतील तर त्यांच्या बुद्धीची किव येते.

# काळाचा योग्य विनियोग केला पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**काळाचा विनियोग आपण ज्या पद्धतीने करतो त्याच पद्धतीने आपलं भविष्य निर्धारित होत असत सुरक्षित भविष्यासाठी काळाचा योग्य विनियोग केला पाहिजे. काळाची गुंतवणूक भविष्य सुरक्षित करते. तारूण्य हा घडण्याचा काळ असतो. हाच घडण्याचा कालावधी आपण घडण्यासाठीच घालवला पाहिजे. तरच आपलं हित होईल अन्यथा आपलं अहित कोणीही रोखू शकणार नाही. आपण स्वतःच आपल्या जीवनाचे शिल्पकार असल्याने आपण आपल्या स्वकर्तुत्वावर स्वतःच जीवन घडविण्यासाठी सदैव दक्ष असल पाहिजे. जीवनात वेळेचं महत्त्व ओळखयला शिकलं पाहिजे ज्या कार्यासाठी जी वेळ निर्धारित आहे.**

त्या काळात तेच कार्य केलं पाहिजे जेणेकरून आपणावर पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. वेळ निघून गेल्यावर आलेली जाग फार काही उपयुक्त नसते. जीवनात पश्चात्ताप हा कोणालाही नको असतो पण हाच पश्चात्ताप करण्याची वेळ येऊ नये म्हणून आपण दक्ष असल पाहिजे. जीवन हे वेगवेगळ्या कालखंडात विभागालेल असतं ज्या काळात जे कार्य कर्तव्य आहे ते केलच पाहिजे. तो काळ व्यर्थ गेला तर मग उर्वरित कालखंडात अनेक प्रभाव अभाव निर्माण होतात. बालपणीचा कालखंड हा जरा मजेदार असतो आपण लहान असल्याने परावलंबी असतो. शाश्वत जग हे फार जवळून बघितलेल नसतं म्हणून कशाचही गांभीर्या या काळात आपल्याला नसतं. पण जसं जसं वय वाढेल तस तसं जबाबदारी आणि कर्तव्य यांचा देखिल विस्तार दिवसेंदिवस वाढत रहतो.जबाबदारी पुर्ण करत असताना उपलब्ध संसाधन आणि आवश्यक गरजा यांचा अनेकदा ताळमेळ लागत नाही. हा मेळ आपण स्वालंबी झालो कि परावलंबी आहेत यावरच जास्त अंवलबुन असतो. म्हणून योग्य वेळी योग्य संधीचा लाभ घेऊन आपण आपलं जीवन घडवलच पाहिजे नाहीतर मग अनेक प्रश्न समस्या आपल्या जीवनात निर्माण होतात.तारूण्य गडबडल तर जीवन गडबडत म्हणून तारूण्य सत्कारणी लावता आल पाहिजे.बालपणी आपण आपल्या कुटुंबातील प्रमुखावर अंवलंबीत असतो. परंतु जेव्हा आपण स्वतः कुटुंब प्रमुख या पदावर विराजमान होतो तेंव्हा मात्र मुल-बाळ त्यांचे शिक्षण भौतिक सुविधा आणि इतर वेगवेगळ्या बाबी याचे खर्च भागविण्यासाठी आर्थिक नियोजन करताना आपली तारांबळ होते.आपण आपला काळा व्यवस्थित घालवून आपलं स्वहित साधलं असेल तर आर्थिक नियोजन गडबडणार नाही.खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ लागण्यासाठी स्वतःला वेळे सोबत घडवायला शिकल पाहिजे.आणि इथं चुक झाली तर मग आपलं सगळं नियोजन कोलमडल जाईल आणि आपल्या हातात वेळ देखिल नसेल. चुक लक्षात येण्याची ही योग्य वेळ नाही.कारण तोपर्यंत आपल्या आयुष्यातील अमुल्य असा काळ निघून गेलेला असतो .जो काळ आपण जिवनात काहीतरी घडून आपल्या दैनंदिन गरजा व्यवस्थितपणे पुर्ण करु शकू अशी व्यवस्था निर्माण करण्याचा असतो तोच कार्यकाळ आपला बहुधा चुकीच्या पद्धतीने व्यर्थ गेल्याने  अनेक समस्या अनेक आव्हानं आपल्या समोर उभी राहतात.जीवनातील आव्हान पुर्ण करताना जो काही त्रास अडचणी निर्माण होतात याला आपण स्वतः जबाबदार आसतो. कारण आपण पंधरा वर्षं ते तीस वर्षे हा घडण्याचा काळ कशा पद्धतीने घालवला कुणाच्या प्रेरणेतून कार्य केले,आपला आधारस्तंभ कोण होत आपली संगती कशी होती,आपण कोणत्या विचाराच्या प्रभावात होतो. त्यानुसारच याचं कालावधीत आपलं धेय्य उद्दीष्ट काय होतं तिथं पर्यन्त पोहचण्यासाठी आपण काय आणि कसे प्रयत्न केले अथवा प्रचंड निष्काळजीपणा केला या पैकी जे केलं ते फल स्वरूप आपल्याला प्राप्त होत.मग इतर कोणाही आपल्या या स्थितीतीस कसं काय जबाबदार असु शकेल म्हणून आपण स्वतः सोडता इतर कोणीही आपल्या चांगल्या वाईट स्थितीला जबाबदार नसतं हे वास्तव स्वीकारायला हवं .एक तर जीवन मार्गावर वाट चुकता काम नये आणि कळतं न कळत वाट चुकली तर पुन्हा किती लवकर योग्य मार्गावर येता येईल यासाठी प्रयत्नशील असल पाहिजे.आपली वाट यदाकदाचित चुकली तर ते आपल्या लक्ष्यात आलं पाहिजे आणि लवकरात लवकर आपल्याला आपली योग्य वाट शोधता आली पाहिजे. जितक्या लवकर आपण वाट शोधू तितकाच लाभ आहे आणि जितका जास्त विलंब होईल तितकंच नुकसान होईल.निराश होणे हा मार्ग नाही तर योग्य मार्ग शोधता आला पाहिजे. म्हणून जीवन वाटेवर वयाच्या योग्य टप्यावर सजग असलं पाहिजे. घडण्याच वय बिघडण्यात जाणार नाही यासाठी आपले संस्कार संस्कृती आणि सामाजिक मुल्य जोपासली पाहिजेत त्याच बरोबर आध्यत्मिक ज्ञान हे सुद्धा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असल पाहिजे जेणेकरून आपण आपला जीवन मार्ग चुकणार नाहीत आणि आपल अनमोल वेळ व्यर्थ देखील जाणार नाही. त्याच बरोबर आपलं आयुष्य फुकट वाया गेल असं म्हणण्याची वेळ देखिल आपल्यावर येणार नाही.याची दक्षता घेऊन आपण मार्गक्रमण केले तर नक्कीच आपल जीवन सार्थक होईल. आपलं जीवन घडण्यासाठी अथवा बिघडण्यासाठी कारणीभूत घटक हे आपल्या समजले पाहिजेत.आपलं जीवन आपल्या अखत्यारीत घडत असतं .आपली  सद्सद्विवेकबुद्धी ज्या पद्धतीने मार्गक्रमण करेल त्या नुसार परिणाम स्वरूप आपल्याला दिसत असतात. तारूण्यात घडण अथवा बिघडण एक निश्चित असतं आपण काय मिळाल्याचं हे आपल्याला समजलं पाहिजे दोन मार्ग पैकी एक योग्य आणि हितार्थ मार्ग आपल्याला निवडता आला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्याविरोधात दिवाळीनंतर रस्त्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा आरक्षणावरून सत्ताधारी महायुतीतील मंत्र्यांमध्ये वादंग सुरू असताना आता ओबीसी समाजाच्या नेत्यांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्यास विरोध करीत ओबीसी नेत्यांनी दिवाळीनंतर रस्त्यावर उतरण्याचा इशारा मंगळवारी दिला.

मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण आंदोलन सुरू केल्यानंतर राज्य सरकारने पूर्वजांची मराठा-कुणबी नोंद असलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रे देण्याबाबतचे पुरावे आणि कार्यपद्धती ठरविण्यासाठी माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांची समिती नेमली. पुरावे सादर करणाऱ्यांना तातडीने कुणबी दाखले देण्याचे आदेश विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्यास भुजबळ यांनी तीव्र विरोध केला असून, जरांगे यांनी उपोषण मागे घेण्यासाठी माजी न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड आणि न्या. सुनील शुक्रे यांनी शिष्टाई केल्याबद्दलही आक्षेप घेतला आहे. भुजबळ यांच्या भूमिकेबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातील नेते आणि मंत्री शंभूराज देसाई यांनी आश्चर्य व्यक्त केले. मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होऊनही सरकारच्या निर्णयाला विरोध करणारी भूमिका भुजबळ कशी घेतात, असा सवाल करीत याबाबत मंत्रिमंडळाच्या बुधवारच्या बैठकीत मुद्दा उपस्थित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. भुजबळ यांना भडक वक्तव्ये करण्याची सवय असल्याची टीकाही त्यांनी केली. त्यामुळे महायुती सरकारमध्येच आरक्षणावरून दुहीचे चित्र दिसले. या पार्श्वभूमीवर कोणीही ओबीसी किंवा इतरांमध्ये संभ्रम निर्माण करणारी वक्तव्ये करू नयेत, अशा कानपिचक्या देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट केले.

दुसरीकडे, मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास ओबीसी नेत्यांनी विरोध केला आहे. धनगर आणि ओबीसी समाजाचे नेते प्रकाश शेंडगे यांच्यासह ओबीसी नेत्यांची भुजबळ यांच्या निवासस्थानी मंगळवारी बैठक झाली. ओबीसी नेत्यांनी फडणवीस आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची भेट घेऊन चर्चा केली. कोणत्याही परिस्थितीत ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये, अशी आग्रही भूमिका ओबीसी नेत्यांनी मांडली. ओबीसी समाज दिवाळीनंतर रस्त्यावर उतरणार असून, राज्यभरात जिल्हा व तालुक्यांच्या ठिकाणी उपोषण, मोर्चे, निदर्शने अशा विविध प्रकारे आंदोलने करण्याचा निर्णय ओबीसी नेत्यांनी घेतला आहे. ओबीसींचा १७ नोव्हेंबरला जालना जिल्ह्यातील अंबड आणि २६ नोव्हेंबरला हिंगोलीला मेळावा होणार असून, आमच्या आरक्षणाचे संरक्षण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. आम्ही मतपेटीतून आमची ताकद दाखवून देऊ, असे शेंडगे यांनी सांगितले. ओबीसी आरक्षणाला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका डॉ. बाळासाहेब सराटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली असून, त्यावर आज, बुधवारी नियमित सुनावणी होण्याची शक्यता आहे. या याचिकेत राज्य सरकारने २००१ मध्ये केलेल्या आरक्षण कायद्याला आणि २३ मार्च १९९४ च्या शासन निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. सुनावणी होईपर्यंत ओबीसी आरक्षणाला स्थगिती देण्याची विनंती करण्यात आली आहे, असे सराटे यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

**आरक्षण ६५ टक्के हवे : नितीशकुमार**

अनुसूचित जाती–जमाती आणि ओबीसींचे राज्यातील आरक्षण सध्याच्या ५० टक्क्यांवरून ६५ टक्के करण्याची आवश्यकता असल्याची भूमिका बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी मंगळवारी मांडली. जातनिहाय आरक्षण ६५ टक्के आणि आर्थिक दुर्बल घटकांसाठीचे १० टक्के मिळून ७५ टक्के आरक्षण होईल. उर्वरित २५ टक्के जागा खुल्या प्रवर्गासाठी असतील, असे नितीशकुमार यांनी जातनिहाय सर्वेक्षणाच्या अहवालावरील विधिमंडळातील चर्चेत स्पष्ट केले. देशपातळीवरही आरक्षण मर्यादा वाढवण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

**बावनकुळेंकडून भुजबळांची पाठराखण**

नागपूर : ''छगन भुजबळांनी घेतलेली भूमिका सर्वपक्षीय बैठकीत ठरल्याप्रमाणेच आहे. त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाचा गुंता सोडवण्यासाठी काम करावे, असे ठरले होते आणि तीच भुजबळांची भूमिका आहे'', अशा शब्दांत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी भुजबळांची पाठराखण केली.

ओबीसी समाजातील एक–दोन नेते थयथयाट करत आहेत. पोलिसांवर दबाव आणून मराठा समाजातील तरुणांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकण्याचा कट काही ओबीसी नेत्यांकडून आखला जात आहे. मराठा नेत्यांनी याबाबत ठोस भूमिका घ्यायला हवी.

**–मनोज जरांगे पाटील, आंदोलक**

# कर्जत- कल्याण रस्त्यावरील अपघातात तिघांचा जागीच मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** कर्जत तालुक्यातील कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर इनोव्हा गाडीला अपघात झाला. या अपघातात इनोव्हा गाडीमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. त्यांच्यावर पनवेल येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नेरळ ग्रामपंचायतचे सदस्य आणि पत्रकार धर्मानंद गायकवाड हे आपल्या नातेवाईक आणि मित्रांसह नेरळ येथे इनोव्हा गाडीने घरी परत येत होते. पहाटे सव्वा तीन वाजता त्यांची गाडी कर्जत कल्याण राज्य रस्त्याने नेरळकडे येत असताना हा अपघात झाला. चालक धर्मानंद गायकवाड यांचा वाहनावरील ताबा सुटला आणि गाडी पनवेल कर्जत रेल्वे मार्गाच्या पुलावरून थेट खाली ३० फूट कोसळली. त्याच वेळी पनवेल येथून कर्जतकडे एक मालवाहू गाडी प्रवास करीत होती. त्यामुळे कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरून कोसळलेली गाडी थेट मालवाहू गाडीवर कोसळली. त्यात मालवाहू गाडीचे कपिलग तुटले आणि त्यामुळे मालगाडी अपघातग्रस्त झाली. यात पत्रकार धर्मानंद यशवंत गायकवाड, मंगेश जाधव, नितीन जाधव यांचा मृत्यू झाला. तर संतोष सखाराम जाधव, पत्रकार जयवंत रामचंद्र हबाळे हे जखमी झाले. त्यांना पुढील उपचारासाठी कामोठे येथे पाठविण्यात आले होते. धर्मानंद गायकवाड यांचे मूळ गाव कर्जत तालुक्यातील आसल हे असून त्यांनी नोकरीच्या निमित्ताने नेरळ येथे राहण्यास सुरुवात केली. त्यानंतर नेरळ गावाचे रहिवासी झालेले धर्मानंद यांनी नेरळ ग्रामपंचायतची निवडणूक लढवली असता ते विजय मिळवून ग्रामपंचायत सदस्य म्हणून गेली चार वर्षे कार्यरत होते.

# रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने रामेश्वर वायाळ यांचे आमरण उपोषण स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**सिंदखेडराजा :** सामान्य जनतेच्या न्याय्य हक्कासाठी १० नोव्हेंबर २०२३ रोजी शेतकरी कामगार पक्षाचे रामेश्वर वायाळ यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी यांना जवळपास दोन हजार गावकऱ्यांच्या सह्यानिशी निवेदन देऊन उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता. सिंदखेडराजा मतदारसंघातील गावं जोडणार्या रस्त्यांना ग्रामीण दर्जा देऊन रस्ता मजबुतीकरण करण्यात यावे. सरंबा फाटा ते पाडळी फाटा हा रस्ता खूपच खराब झाला आहे. तसेच पाडळी शिंदे ते खैरव फाटा हा रस्ता सुद्धा खूपच खराब झाला आहे. अंढेरा फाटा ते मलकापूर पांगरा या अति चाळणी झालेल्या रस्त्याचे तात्काळ नवीन काम करून होणारे जीव घेणे अपघात थांबून जनतेला न्याय द्यावा. अशा इतर मागण्या सदर निवेदनात होत्या.रामेश्वर वायाळ यांच्यासह नागरीकांच्या सह्यांच्या निवेदनाची दखल घेऊन तढेगाव फाटा ते खैरव या रस्त्याची खड्डे भरणे होत आले आहे. तसेच सरंबा फाटा ते पाडळी या रस्त्याचे काम सुरू झाले आहे. तसेच मलकापूर पांगरा ते अंडेरा फाटा रस्त्याचे काम सुरू झाली आहे. तसेच सुरा ते शिवनी आरमाळ, बायगाव रस्त्याचे सुद्धा काम सुरू झाले आहे. इतर कामं लवकरात लवकर सुरू होणार आहे असे लेखी आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभाग व मुख्यमंत्री ग्राम सडक योजना या तिघांनी सुद्धा मागण्या मान्य करून दिले. यामुळे अखेर दिनांक १० /११/ २०२३ रोजी चे जनतेसाठीचे उपोषण मागण्या मान्य झाल्यामुळे व काम सुरू झाल्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले आहे. यावेळी मा. गायकवाड साहेब उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांच्या मध्यस्थीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता मा. काबरे साहेब व आढाव साहेब तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे मा. दळवी साहेब यांनी मागण्या मान्य करून लेखी आश्वासनाचे पत्र दिले त्यावेळी उपोषण करते भाई रामेश्वर सुखदेव वायाळ शेतकरी कामगार पक्ष सहचिटणीस बुलढाणा, सिद्धेश्वर साहेबराव चेके सरपंच सुरा, प्रकाश गरड उपसरपंच खैरव, मनोज उद्धव वायाळ हे हजर होते .




महाराष्ट्र Business Katta












# मानवतेचा दीप लावू!




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते.**

शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान ममुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. गेल्या वर्षी दिवाळी वरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. सुदैवाने यावेळी दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता येणार आहे. त्यामुळे लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. हा उत्साह पुढे देखील असाच कायम राहणार आहे कारण दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा उत्सव आहे.



**दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!**

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

# रस्त्यावर फिरणारी भटकी कुत्री बनली धोकादायक



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते.**

कुत्रा हा सर्वात निष्ठावान प्राणी आहे असे म्हटले जाते. अनेक शतकांपासून घरांच्या राखणीसाठी कुत्रे पाळण्याची परंपरा आहे. मात्र आजकाल कुत्र्यांच्या वागण्यात झालेला बदल आश्चर्यकारक आहे. देशात दरवर्षी सुमारे वीस हजार लोकांचा कुत्रा चावल्यामुळे मृत्यू होतो. आकडेवारीनुसार, दरवर्षी देशातील विविध राज्यातील सुमारे 77 लाख लोकांना कुत्रा चावण्याच्या घटनांना सामोरे जावे लागत आहे.यामध्ये रस्त्यावरील कुत्र्यांनी चावा घेतल्याची संख्या सर्वाधिक आहे. नुकतेच वाघ बकरी चहाच्या मालकाचा भटक्या कुत्र्यांमुळे मृत्यू झाल्याची घटना चर्चेचा विषय ठरली. ते मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले असता पाठीमागून भटक्या कुत्र्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यांच्यापासून सुटका करून घेण्यासाठी ते पळत असताना त्यांचा पाय घसरला आणि ते खाली पडले. त्यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला.गेल्या काही वर्षात कुत्र्यांचे पालनपोषण आणि निवासी भागात फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेल्या असंख्य घटना घडल्या आहेत. पण याबाबतीत आपला समाज दोन वर्गात विभागलेला दिसतो. एक विभाग प्राण्यांच्या हक्कांबद्दल बोलतो, तर दुसरा भाग कठोर कायदे बनवण्याचे समर्थन करतो.

काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशमध्ये एका निष्पाप मुलाला कुत्र्याने चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. असं असलं तरी ग्रामीण भागात अशा घटनांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. मुलाने कुत्रा चावल्याची माहिती घरी दिली नाही. काही दिवसांनी मुलाला त्रास होऊ लागला आणि त्याचे वडील त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेले. मात्र डॉक्टरांनी मुलाला आणण्यास उशीर झाल्याचे सांगत मुलावर उपचार करण्यास नकार दिला. मुलामध्ये रेबीजचे जंतू तयार झाले होते. यातून आपल्या समाजाची निष्क्रियता दिसून येते, इथे हजारो लोक अनैसर्गिकपणे मरण पावतात, पण सरकार आणि समाज त्याला सामोरे जाण्यासाठी सतर्क होताना दिसत नाही. आपण आणि आपला समाज अशा गोष्टींवर मूग गिळून बसतो. विशेषतः भटक्या कुत्र्यांनी चावण्याच्या अलीकडच्या घटनांबाबत सरकार आणि समाजाचे मौन अनेक प्रश्न निर्माण करते. भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी सरकारकडून भरघोस बजेट ठेवण्यात आले आहे. स्थानिक स्वराज संस्थादेखील यावर बरेच खर्च दाखवाते, मात्र प्रश्न जैसे थे असल्याचे दिसून येते. जगाच्या आकडेवारीनुसार कुत्रा चावल्यामुळे सर्वाधिक मृत्यू आपल्या देशातच होतात. जागतिक स्तरावर कुत्रा चावल्यामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ३६ टक्के मृत्यू एकट्या भारतात रेबीजमुळे होतात. आणि बहुतांश प्रकरणांची नोंदच होत नाही, हेही चिंताजनक आहे. पशुधनाच्या सरकारी आकडेवारीनुसार चार वर्षांपूर्वीपर्यंत देशात 1 कोटी 93 लाख भटकी कुत्री होती. एकट्या उत्तर प्रदेशात त्यांची संख्या 20 लाख 60 हजार एवढी होती. सध्या देशात त्यांची एकूण संख्या सुमारे सहा कोटींवर पोहोचली आहे. त्यांची संख्या ज्या प्रकारे वाढत आहे, ते भविष्यातील गंभीर आव्हान दर्शवते. एकट्या मुंबईत 2014 च्या गणनेनुसार 95 हजार 174 भटके कुत्रे असले, तरीही आता या संख्येत मोठी वाढ झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. अद्याप भटक्या कुत्र्यांची गणना झालेली नाही. आणखी एका अहवालानुसार, गेल्या वर्षी सुमारे 14.5 लाख लोकांना कुत्र्यांनी गंभीरपणे चावा घेतला होता. 2021 मध्ये हा आकडा फक्त सात लाख होता. आता परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, 10 सप्टेंबर 2022 रोजी सुप्रीम कोर्टानेही भटक्या कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांवर तोडगा काढण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. कुत्रा चावल्याने रेबीज होतो हे सर्वांनाच माहिती आहे.शासकीय रुग्णालयांमध्ये रेबीज लसीकरणाची व्यवस्था



केली जाते. मात्र सध्या सरकारी रुग्णालयांची अवस्थाही बिकट आहे. रेबीजची लस उपलब्ध नसल्याचेच अधिक प्रमाणात ऐकायला मिळते. ही भटकी कुत्री निरागस मुलांना सहज आपली शिकार बनवतात. लोकसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, 2019 मध्ये देशात सर्वाधिक 72.77 लाख कुत्र्यांनी चावल्याच्या घटना घडल्या होत्या. विशेष म्हणजे, भारतात दरवर्षी सुमारे दोन कोटी लोकांना विविध जनावरांच्या चावण्याच्या घटना घडतात.. यापैकी 92 टक्के प्रकरणे केवळ कुत्र्याने चावल्याची आहेत. तर जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO) जगात रेबीजमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी 36 टक्के मृत्यू एकट्या भारतात होतात. तसे पाहिले तर दर महिन्याला अठरा हजार ते वीस हजार लोकांचा रेबीजमुळे मृत्यू होतो. मृत्युमुखी पडणाऱ्यांपैकी बहुतांश निष्पाप मुले आहेत. आकडेवारीनुसार, तीस ते साठ टक्के प्रकरणांमध्ये पीडितांचे वय पंधरा वर्षांपेक्षा कमी आहे. 1960 मध्ये, 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंध' (PCA) कायदा संमत करण्यात आला, ज्याचा उद्देश प्राण्यांवरील क्रूरता थांबवणे हा होता.'ह्युमन फाऊंडेशन फॉर पीपल अँड ॲनिमल्स'च्या अध्यक्षांच्या मते, पीसीए आणि राज्यातील महापालिका कायद्यांतर्गत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक ठिकाणांवरील भटक्या कुत्र्यांना हटवण्याची तरतूद केली गेली होती. या अंतर्गत कायद्यात एक बोर्ड तयार करण्यात आला होता, ज्याचे काम 'स्थानिक अधिकारी आवश्यक त्या ठिकाणी अनावश्यक जनावरे नष्ट करणे' याची खात्री करणे हे होते. परंतु 2001 मध्ये हळूहळू भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी सरकारने 'ॲनिमल बर्थ कंट्रोल' तयार केले. '. नियम' (ABC), जे भटक्या कुत्र्यांचे नसबंदी आणि लसीकरण प्रदान करते. कुत्र्यांच्या कल्याणाची जबाबदारी व्यक्ती, प्राण्यांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संस्था आणि स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आली. परंतु वरील नियमांमुळे कुत्रे अधिक धोकादायक बनले आहेत, असाही एक मत या विषयावर समोर आला आहे. मुंबईतील भटक्या कुत्र्यांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या एका संस्थेच्या सीईओचेही मत आहे की कुत्रा चावणे ही गंभीर समस्या बनली आहे.

ते म्हणतात की, 'अशा घटना घडू नयेत, अशी सर्वांचीच इच्छा आहे, पण हे खूप खेदजनक आहे.' आज असे एकही राज्य उरले नाही जिथे भटक्या प्राण्यांनी दहशत निर्माण केली नाही. तसे पाहिल्यास, प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी न होणे हे त्याचे प्रमुख कारण आहे. भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय होताना दिसत नाही हे खरे आहे. आपल्या देशात प्राण्यांना मारणे हे गुन्ह्याच्या श्रेणीत येते, त्यामुळे कुत्र्यांना मारण्याचा पर्यायही विचारात घेता येत नाही, कारण सुसंस्कृत समाजात हे अत्यंत क्रूर कृत्य असेल. त्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी नसबंदी हाच पर्याय आहे. तज्ज्ञांच्या मते, यासाठी 70 टक्के भटक्या कुत्र्यांची नसबंदी करावी लागणार आहे. हे एक अतिशय कठीण लक्ष्य आहे. कुत्र्यांसाठी निवारागृहेही बांधली जाऊ शकतात, त्यासाठी सरकारला वेगळे बजेट ठेवावे लागेल. वेळीच कायमस्वरूपी पावले उचलली जात नसल्यामुळे अनैसर्गिक मृत्यूमुळे राज्यघटनेने हमी दिलेल्या लोकांच्या जगण्याच्या स्वातंत्र्यावर परिणाम होत आहे.

# भारतात क्रिकेट खेळाला गरजेपेक्षा जास्त महत्त्व!

आधुनिक केसरी

आपल्या भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकी आहे.मेजर ध्यानचंद या महान खेळाडूने ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला सुवर्णपदके मिळवून दिली आहेत. त्यामुळे त्यांना हॉकीचे जादूगार म्हटले जाते.असे असूनही भारतात हॉकी खेळापेक्षा जास्त क्रिकेट खेळ लोकप्रिय आहे आणि क्रिकेट या खेळाला गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते ही आजची वस्तुस्थिती आहे.एकीकडे इंग्रजांनी भारतात मागे ठेवून गेलेल्या स्मृतींचा व वस्तूंचा आपण भारतीय लोक तिरस्कार करतो आणि त्याच इंग्रजांच्या क्रिकेट खेळाचे आम्हा भारतीयांना केवढे अप्रूप? गल्ली पासून ते दिल्लीपर्यंत क्रिकेट खेळ आवडीने खेळला जातो आणि पाहिला जातो.क्रिकेट खेळाची ही लोकप्रियता एकीकडे उफाळून आली आहे तर दुसरीकडे भारतात काही समस्या अजूनही तोंड वासून उभ्या आहेत! सध्या भारतात एकदिवसीय क्रिकेट सामन्यांची वर्ल्ड कप स्पर्धा सुरु आहे. त्यामुळे जिकडे तिकडे क्रिकेटचा फिवर चढला आहे. काही वर्तमानपत्रांत क्रिकेट खेळ आणि क्रिकेट खेळाडू बद्दल भरभरून लिहिले जात आहे. भारतात क्रिकेट खेळाला खेळ म्हणून न पाहता त्याला व्यावसायिक रूप व बाजारपेठेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. खेळ हा मनोरंजनासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी असतो. जागतिक स्तरावर क्रिकेट खेळात सध्या भारताचा बोलबाला आहे. इथल्या क्रिकेट मंडळाने जागतिक क्रिकेट मंडळावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे आणि भारतीय क्रिकेट मंडळ सर्वात जास्त श्रीमंत क्रिकेट मंडळ समजले जाते.या क्रिकेट क्षेत्रातील राजकारण, इथली व्यवस्था, संघातील खेळाडूंची होणारी निवड याबाबत सोशल मीडियावर उलटसुलट वाचायला व पहायला मिळते. गुणवंत खेळाडूंना डावलून मर्जीतील खेळाडूंची होणारी निवड याबद्दल ही चित्रविचित्र अफवा ऐकायला येतात. बोली लावून आयपीएल मध्ये करोडो रुपयांची उधळपट्टी करुन खेळाडूंची खरेदी केली जाते. अशाने क्रिकेटला निकोप आनंदासाठीचा खेळ कसे काय म्हणता येईल? क्रिकेटच्या नादात इतर खेळांची व इतर खेळाडूंची वाताहत होत आहे. आयपीएल क्रिकेटच्या धर्तीवर प्रो कबड्डी लीग आणली गेली आहे. परंतु क्रिकेट एवढी क्रेझ कबड्डी लीगला प्राप्त झाली नाही.सांगायचा मुद्दा असा आहे की भारतात सामाजिक समस्या खूप आहेत. अनेक लोक फुटपाथवर राहतात,त्याच्यापेक्षा जास्त कुटुंब पालात किंवा मोडक्या तोडक्या झोपडीत राहतात. त्यांना किमान दोन वेळचेही पोटभर जेवण मिळत नाही. अंगाला कपडालत्ता नसतो. आजारी पडल्यास उपचारासाठी पैसा नसतो. शेतकऱ्यांची हेळसांड व शेतमालाला कवडीची किंमत या बाबी फार वेदना देणाऱ्या आहेत. भारतात अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या इमारती जीर्ण झालेल्या आहेत पण क्रिकेट खेळांचे मैदाने भव्य दिव्य, चकाचक आणि सगळ्या सुखसोयींनी युक्त आहेत. म्हणजे भारतात गरिबांना, शेतकऱ्यांना, मजूरांना, कामगारांना माणूस म्हणून काहीच किंमत नाही पण क्रिकेट खेळाला आणि क्रिकेट खेळाडूंना खूप जास्तीची किंमत व वलय प्राप्त झाले आहे. क्रिकेटचा बाजार मांडून बसलेले राजकारणी आणि श्रीमंतीत लोळणारे क्रिकेट खेळाडू यांना जे वैभव प्राप्त झाले आहे ते सर्वसामान्य भारतीय लोकांच्या जीवावर.

बबन दामोदर गुळवे
मो.९५४५४४२६४८.


# `मुगल-ए-आझम'चे दिग्दर्शन करण्यास सोहराब यांनी दिला होता नकार

आधुनिक केसरी

**आजच्या काळात यशस्वी होण्यासाठी लोक आपल्यापुढे येईल त्या संधीवर झडप घालण्यासाठी जसे आतुर झालेले असतात तसेच एखादी संधी हातची जाऊ नये म्हणून ते दुसऱ्याचा केसाने गळा कापायलाही मागेपुढे पाहात नाहीत. गतकाळातील निर्माता-दिग्दर्शक-अभिनेता असलेल्या व्यक्तीपुढे भारतीय चित्रपटसृष्टीतील कालातीत म्हणून गौरविल्या गेलेल्या एका चित्रपटाचे दिग्दर्शन करण्याची नामी संधी चालून आली. परंतु त्या चित्रपटाच्या निर्मात्याच्या वाहनचालकाने तो चित्रपट दिग्दर्शित करत असलेल्या दिग्दर्शकाबद्दल त्या व्यक्तीला अशा काही गोष्टी सांगितल्या, की त्या व्यक्तीने दिग्दर्शनाची आलेली संधी साधण्याऐवजी मनाचा मोठेपणा दाखवून चित्रपटाचे दिग्दर्शन करण्यास नकार दिला. त्या व्यक्तीच्या नकारामुळे त्या चित्रपटाच्या दिग्दर्शकाचे नाव तो चित्रपट कमालीचा यशस्वी ठरल्याने चित्रपटाच्या इतिहासात कायमचे सुवर्णाक्षरांनी कोरले गेले.**

१९६० साली अनेक चित्रपटगृहांमधे झळकलेला `मुगल-ए-आझम' हा चित्रपट निर्माण करण्याचे स्वप्न के. आसिफ १९४६ सालापासून उराशी बाळगून होते. हा चित्रपट भारतीय चित्रपटाच्या इतिहासातील केवळ चांगला नव्हे तर सर्वश्रेष्ठ चित्रपट ठरला पाहिजे या तीव्र इच्छेमुळे के. आसिफ यांना तो पडद्यावर भव्य-दिव्य स्वरूपात सादर करावयाचा होता. हा चित्रपट त्यांच्यासाठी केवळ चित्रपट नव्हता तर त्याचा त्यांना जणू ध्यासच लागला होता आणि म्हणूनच त्याबाबत कोणतीही तडजोड करावयास ते अजिबात तयार नव्हते. १९५० साली के. आसिफ यांनी `मुगल-ए-आझम'चे चित्रीकरण सुरू केले त्यावेळेपर्यंत त्यांनी `फूल' या एकमेव चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. 'मुगल-ए-आझम' या चित्रपटाला शापूरजी-पालनजी अर्थपुरवठा करत होते. दिग्दर्शक के. आसिफ प्रत्येक बारीक सारीक बाबीत परिपूर्णता कशी राहील या विषयी आग्रही असल्याने चित्रपटाचा खर्च जसा दिवसेंदिवस वाढत चालला होता तशीच निर्मितीचीही ओढाताण होऊ लागली होती. अखेर के. आसिफ यांच्या या परिपूर्णतेला शापूरजी-पालनजी कंटाळले. `मुगल-ए-आझम'चे जितके चित्रीकरण उरले आहे ते कोणा अन्य दिग्दर्शकाकडून करवून घेण्याचा आणि के. आसिफ यांना दिग्दर्शकपदावरून दूर करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. चित्रपट पूर्ण करण्यासाठी त्यांनी सोहराब मोदी यांची निवड केली. सोहराब मोदी यांनी एक डझनाहून अधिक चित्रपट दिग्दर्शित केले होते. शापूरजी-पालनजी आणि सोहराब मोदी यांच्यांत एक-दोन नव्हे तर अनेक बैठका झाल्या. सगळ्या गोष्टी ठरल्यावर सोहराब मोदी `मुगल-ए-आझम'चा सेट पाहण्यासाठी स्टुडिओत गेले. सेट पाहून ते परत जाण्यासाठी निघाले आणि त्यांची गाडी नादुरुस्त झाली. सोहराब मोदी यांची गाडी बिघडल्याचे शापूरजी-पालनजी यांना कळताच त्यांनी त्वरित स्वतःच्या गाडीतून सोहराब मोदी यांना त्यांच्या निवासस्थानी सोडून ये, असे आपल्या वाहनचालकाला सांगितले. सोहराब मोदी त्या गाडीत बसले आणि गाडी मोदी यांच्या निवासस्थानाच्या दिशेने निघाली. रस्त्यात मोदी त्या वाहनचालकाशी इकडच्या तिकडच्या गप्पा मारू लागले. बोलण्याच्या ओघात चालक सोहराब मोदींना म्हणाला, साहेब हे आसिफ मियां म्हणजे एक नमुनेदार माणूस आहेत. या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी अनारकलीसाठी हिरे-मोती आणावेत म्हणून अडून बसतात आणि स्वतः मात्र चक्क चटईवर झोपतात. जेव्हा त्यांचे मानधन येते तेव्हा आपले मित्र आणि स्टुडिओतील कामगार व अन्य गरजूंना ते वाटून टाकतात. साहेब, हा अतिशय भला माणूस आहे.





त्या वाहनचालकाचे बोलणे सोहराब मोदी बारकाईने ऐकत होते. प्रत्युत्तरादाखल ते वाहनचालकाला काही म्हणाले नाहीत ; पण चालकाचे एक एक वाक्य थेट त्यांच्या हृदयाला भिडले. रस्ताभर त्यांनी चालकाकडून के. आसिफ यांच्याबद्दल बरेच काही ऐकले आणि त्यावर शांतपणे विचार करू लागले. स्वतःच्या निवासस्थानी पोहोचताच सोहराब मोदी यांनी सर्वप्रथम शापूरजी-पालनजी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि `मुगल-ए-आझम'चे दिग्दर्शन करण्यास त्यांना साफ नकार कळविला. त्याबरोबरच शापूरजी-पालनजी यांना त्यांनी एक महत्त्वाचा सल्लाही दिला. ते शापूरजी-पालनजी यांना म्हणाले, की तुमच्या या चित्रपटाचे भले व्हावे असे तुम्हाला वाटत असेल तर त्याचे दिग्दर्शन कोणा अन्य दिग्दर्शकाकडे सोपवू नका; कारण हा चित्रपट केवळ आणि केवळ के. आसिफ यांच्यासाठीच आहे !

दाण्या दाण्यावर खाणाऱ्याचे नाव लिहिलेले असते असे म्हटले जाते ते उगीच नाही ! `मुगल-ए-आझम'चा सेट पाहून परतताना सोहराब मोदी यांची गाडी नादुरुस्त झाली नसती आणि के. आसिफ यांच्याबद्दल बरीच माहिती सांगणाऱ्या त्या वाहनचालकाबरोबर त्यांचे बोलणे झाले नसते तर कदाचित `मुगल-ए-आझम`चे दिग्दर्शन सोहराब मोदी यांनी केले असते. परंतु वाहनचालकाचे बोलणे ऐकल्यानंतर सोहराब मोदी यांनी दिलेल्या नकारामुळे `मुगल-ए-आझम' हा चित्रपट के. आसिफ यांच्या हातून निसटता निसटता वाचला. त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे १९६० साली `मुगल-ए-आझम' अनेक चित्रपटगृहांमधे प्रदर्शित झाला आणि त्याने असा इतिहास लिहिला की जो आजवर अबाधित राहिला आहे !

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# ..तरीही आम्ही फटाके वाजवण्यासाठी सज्ज आहेत !

आधुनिक केसरी

**बाजारात फटाक्यांची दुकाने ठिकठिकाणी दिसत आहेत. म्हणजे अगदी प्रत्येक गल्लीत ती दुकाने थाटलेली दिसतात. फटाक्यांच्या विक्रीच्या माध्यमातून हंगामी उत्पन्न मिळत असले तरी याचा समाजाला काय उपयोग ? असा व्यापक विचार होताना दिसत नाही. फटाके विक्रेता कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित आहे. ते कळण्यासाठी काही ठिकाणी फटाक्यांच्या स्टॉल्सवर राजकीय पक्षांचे बॅनर लावले जातात. जे यंदाही दिसत आहेत. फटाके विक्रीतून मिळणारा नफा मोलाचा की त्यामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे होणारा निसर्गाचा आणि पर्यायाने समाजाचा तोटा ? कोण कुठला समाज. 'आम्ही केवळ आमचा विचार करतो.**

नाहीतरी प्रत्येक जण तेच करतो. मग आम्ही फटाके विक्रीच्या माध्यमातून चार पैसे मिळवले तर कोणाच्या पोटात का दुखावे ? रोजच्या गरजांच्या पूर्तीसाठी म्हणा किंवा अन्य खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले पैसे कोणी खिरापत म्हणून वाटत नसते. त्यामुळे प्रदूषण वगैरेचे उपदेश आम्ही मानत नाही' , असा विचार रूढ झाला आहे. मराठी माणूस फटाके विक्रीच्या व्यवसायात अग्रस्थानी दिसतो. अन्य राज्यांतून येणाऱ्या लोकांनी उदरनिर्वाहासाठी उपाहारगृह थाटली, भेळ - पाणीपुरीच्या गाड्या टाकल्या, भाजी - मच्छीही विकत आहेत. राज्याचे भूमीपुत्र म्हणवणारे व्यवसाय थाटण्यासाठी दिवाळीच्या औचित्यपर फटाके विक्रीचा स्टॉल कधी लावता येईल, याचाच विचार करत असतात का ? असा प्रश्न पडतो. घाऊक बाजारातून फटाके आणून स्थानिक ठिकाणी कसे विकता येतील ? यासाठी शक्कल लढवत आहेत.

दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या सायंकाळी सर्वाधिक फटाके वाजवले जातात. अगदी हक्काचे दिवस असल्याप्रमाणे दिवाळीच्या अन्य दिवसांतही हमखास ते वाजतच असतात. किंबहुना सक्तीने हा तोंड दाबून देण्यात येणारा बुक्क्यांचा मार सहन करावाच लागतो. वाजवण्यासाठी अमुक हजार रुपयांचे फटाके आणले आहेत' , याचे भूषण वाटणारे महाभागही आहेत. एका बाजूला लक्ष्मी देवीची विधीवत पूजा करायची आणि दुसऱ्या बाजूला लक्ष्मी देवतेचे स्वागत फटाक्यांचा कचरा आणि धूर करून करायचे. ही विसंगती न वाटता तसे न करणाऱ्यांची टिंगल केली जाते. इतका वैचारिक विकृतीने तळ गाठला आहे. फटाके विक्रेता - वाजवणारा आणि ते न वाजवणारे असे सर्वच जण याच निसर्गातून मिळत असलेल्या प्राणवायूवर जिवंत आहेत. पण त्या निसर्गाची चिंता केवळ फटाके न वाजवणाऱ्या मंडळींना असते आणि यांनाच मूर्खात काढले जात आहे.

दुकानांतून मोठ्या आवाजाचे फटाके ( सुतळी बॉम्ब, रॉकेट बॉम्ब इत्यादी ) खरेदी केले जातात. इथे निसर्ग पायाखाली ( बुडाखाली ) भूकंपाचे धक्के देत गदागदा हलवत आहे. याचा विचार जिथे हे धक्के बसत आहेत ते करतील. असे म्हणत फटाक्यांमुळे कुठे भूकंप होतो ? त्याचा आणि फटाक्यांचा संबंध नाही. बुद्धीभेद करणारा हा तर्कशून्य विचार लांच्छनास्पद आहे. वायू - जल रूपात होणारे कोणतेही प्रदूषण निसर्गालाच जाऊन मिळते. हा विचार करण्याची बुद्धीची पोच नसणारी, अशी मंडळी मोठ्या तीव्रतेचा भूकंप होऊन पडझड चालू झाल्यावर स्वतःचा जीव वाचवण्यासाठी अधिक आकांडतांडव करतील.

फटाक्यांवर कायमची बंदी आणण्याचा विचार कधी होईल का ? याचे उत्तर नाही असेच वाटते. प्रदूषणामुळे श्वास कोंडत आहे. पण तरीही फटाक्यांवर बंदी आणायचा सरकार पातळीवर विचारही होत नाही. याचे खरच आश्चर्य वाटते. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी फटाके बंदी होणे अशक्य वाटते. कारण निसर्ग म्हणून निसर्गाकडे गांभीर्याने पाहण्याचा व्यापक विचार करण्याची आवड दिसत नाही. दोन - चार वृक्ष लावताना फोटो काढले की झाले निसर्गाचे संवर्धन ? असे करून निसर्ग जपता येत नाही. याची कल्पना असूनही औपचारिकतेला पर्याय नाही. असेच वागले जाते. फटाके फोडण्यासाठी ठराविक वेळ घालून दिली तरी त्याचे कोणीही पालन करत नाही. कारण फटाके वाजवणाऱ्या लोकांचा आणि वेळेचा दुरान्वयेही संबंध नसतो. फटाके वाजवण्याची वेळ ठरवणे म्हणजे एक औपचारिकता आहे. म्हणजे हे असे झाले. फटाके वाजवा. पण ठराविक वेळेत. अशा ठिकाणी फटाके बंदीची डाळ शिजणे अशक्यच !

फटाके वाजवण्यासाठी पैसे खर्च करण्यापेक्षा गरिबांना दिवाळीचा फराळ, नवीन कपडे इत्यादी देण्यासाठी तेच पैसे खर्च करता येतील. अहो, तुमच्यामुळे कोणाची दिवाळी गोड झाली तर चांगलेच आहे ना ? इतका साधा विचारही करण्यासाठी बुद्धी चालवण्याची इच्छा नसणे यासारखा माणुसकी शून्यपणा नव्हे. बर, कोणाला काही द्यायची नियत नसेल तर किमान निसर्गावर आणि श्वासाशी निगडीत विकार असणाऱ्या रुग्णांवर फटाके वाजवून अन्याय तरी करू नका.

'लहान मुले हट्ट करतात की, आम्हाला फटाके पाहिजेत. त्यामुळे त्यांच्या हट्टाच्या पूर्ततेसाठी म्हणून फुलबाजा, चक्र, पाऊस असे फटाके घ्यावे लागतात. ते नाही घेतले तर घरी जायला नको. रडून मुल उच्छाद करेल. असे होण्यापेक्षा त्याला हवे ते फटाके देऊन आधीच त्याला शांत केलेले बरे' , पालकांचा हा विचार पाल्याला केवळ स्वतःचाच विचार करण्यास प्रेरीत करतो. एरव्ही मुल रडू लागल्यावर त्याला शांत करण्यासाठी त्याला मोबाईल, टॅब यांसारखी इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट्स हाताळायला दिली जातात. मुलाला शांत करण्यासाठी पालक तो मागेल ते देतात. पण नेमके जे द्यायला पाहिजे तेच देत नाहीत. किंबहुना, तो अजून लहान आहे असे म्हणत त्याचा हट्ट पुरवण्यात आनंद मानतात. मुलांना बालपणापासूनच निसर्ग - सामाजिक कर्तव्य - रुग्ण यांच्याविषयी त्यांची कर्तव्ये काय आहेत ? याची जाणीव करून दिली पाहिजे. मुलांना त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितले की, ते त्यांच्या मनावर कोरले गेले समजा. मुले अनुकरण प्रिय असल्याने लहानपणापासूनच त्यांच्यापर्यंत योग्य विचार पोचत राहाणे अनिवार्य आहे. अन्यथा वय पुढे पुढे सरकत चालले की, चांगले विचारही चुकीचे वाटू लागतात. त्याचा परिणाम काय होतो ? याची प्रचिती दिवाळीत वायू प्रदूषणाच्या रूपात घेतच आहोत.




फटाक्यांच्या बाजारात ९५ टक्के फटाके हरित फटाके असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, या फटाक्यांपैकी अनेक फटाक्यांमध्ये 'बेरियम' हा घातक धातू आढळून आल्याचे 'आवाज फाऊंडेशन'कडून सांगण्यात आले आहे. वर्ष २०१८पासून 'आवाज फाऊंडेशन' फटाक्यांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण आणि फटाक्यातील घटक यांच्या चाचण्या करत आहे. बेरियम या घटकावर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घालूनही हा घटक फटाक्यांमध्ये आढळल्याने 'आवाज फाऊंडेशन'ने या फटाक्यांच्या विक्रीवर निर्बंध आणले जावेत, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून केली आहे. विकार पसरवणारे घटकच उघडपणे विकले जाणे धोक्याचे आहे. पण आता ऐन दिवाळीच्या तोंडावर काय केले जाणार ?

'दिवाळीत फटाके फोडणे टाळा आणि मास्क वापरा' असे आवाहन राज्याच्या आरोग्य विभागाने केले आहे. या आवाहनाला फटाक्यांच्या धुरात लुप्त करण्याचे काम लोक कसे करतात हे समजेलच. कारण त्यांनी फटाके वाजवण्याची सज्जता करून ठेवली आहे. मास्कच्या उपयोगाशी देणेघेणे नसल्याचा त्यांचा आविर्भाव आहे. फटाक्यांच्या उपयोगाने इतरांसह स्वतःचाही जीव धोक्यात आहे. हे ज्यांना जाणून घ्यायचे नाही ते माणूस म्हणून तरी दुसऱ्याचा विचार काय करणार ?

स्वतः वाढवून ठेवलेल्या गरजांच्या पूर्ततेसाठी पैसा हवाच. मग तो कमावण्यासाठी प्रसंगी अहोरात्र मेहनत करणे, हा पैसा कुठे गुंतवता येईल ? जेणेकरून उत्तम परतावा मिळेल यासाठी शोधाशोध करणे. याच विचारांच्या भोवती माणसाचे आयुष्य फिरत आहे. अशा धावपळीच्या जीवनात निसर्गाचे आपण देणे लागतो त्यासाठी पुढाकार घेऊन काही करण्याचा विचार कुठे आहे का ? अजिबात नाही. झाडे लावण्यासाठी जागा शेष ठेवलेली नाही. यातच सर्व आले. निसर्ग टिकला तर सजीव सृष्टी टिकेल. हे कानाला ऐकायला चांगले वाटते. पण त्यासाठी झटण्याची तयारी फक्त हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या लोकांचीच आहे. बाकी म्हणजे आयजीच्या जीवावर बायजी उधारप्रमाणे दिवस ढकलत आहेत.

क्षेपनभूमीवर प्रतिदिन जमा होणाऱ्या कचऱ्याचे ढीग साचत आहेत. तेथील कचरा जाळल्यावर येणाऱ्या दुर्गंधीने अक्षरशः जीव गुदमरतो. या कचऱ्यात फटाक्यांच्या कचऱ्याचा होणारा अतिरिक्त समावेश म्हणजे श्वसनाचे विकार असणाऱ्या रूग्णांच्या जखवेवर जाणीवपूर्वक मीठ चोळणे होय.

फटाक्यांचा कचरा उचलण्यासाठी स्थानिक मनपा, जिल्हा परिषद यांचे स्वच्छता कर्मचारी म्हणजे रस्ते स्वच्छ करणारे हक्काचे कर्मचारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. स्वतः कचरा करायचा आणि तो साफ करण्यासाठी दुसऱ्यावर सक्तीने भार टाकायचा. निर्लज्जपणाची सीमा म्हणतात ती हीच.

राजधानी दिल्लीसह देशाच्या विविध भागांत वायू प्रदूषण वेगाने पसरत आहे. राजधानीतील प्रदूषणाची घातक पातळी लक्षात घेता शाळांना सुट्टी द्यावी लागणे असे कित्येक वर्षे चालू आहे. तरीही पालथ्या घड्यावर पाणीच. असे म्हणता येईल. कारण प्रदूषणाने धोक्याची पातळी गाठल्यावर तात्पुरते जागे होऊन दाखवले जाते. देशाची राष्ट्रीय राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक शहरांवर प्रदूषणाची दाट छाया आहे. विदारक स्थिती करून ठेवली आहे देशातील प्रमुख महानगरे आणि शहरांची. बेसुमारपणे फुगत चाललेल्या लोकसंख्येच्या अन्न पदार्थ विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी शेतीत रासायनिक खतांचा उपयोग होतो. त्यामुळे अन्नात कसदारपणा नाही. परिणामी माणसाची प्रतिकारशक्ती कमकुवत झाल्याने अनेक आजारांनी त्याला घेरले आहे. प्रदूषित वातावरणात पिकत असलेले धान्य कसे असणार ? हे सुज्ञास सांगणे न लागे.

दीपावली व्यतिरिक्त निवडणूक निकाल, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात आगमन - विसर्जन मिरवणुका, 25 डिसेंबर, 31 डिसेंबरच्या मध्यरात्री, नेत्यांच्या सभांच्या वेळी, तसेच विभागात त्यांच्या भेटी दरम्यान, क्रिकेट सामने, विवाहाच्या मिरवणुका इत्यादी वेळी फटाक्यांचा धुमधडका पाहण्यास मिळतो. दिवाळीत फटाक्यांमुळे आग लागण्याच्या दुर्घटना होणे, भाजणे, डोळ्यांना दुखापत होणे. प्रसंगी तो अवयव निकामी होणे या घटनांकडे तर एकदम क्षुल्लक म्हणून पाहिले जात आहे. बाका प्रसंग कोणावर कधी ओढवेल हे सांगता येत नसते. कारण त्याची कटू फळे फटाक्यांशी संबंध नसलेलेच जास्त

जयेश राणे
मुंबई.



# समता सैनिक दलाच्या शाखेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे समता सैनिक दल ची स्थापना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 19 मार्च 1927 ला केली. बाबासाहेबांच्या प्रत्येक आंदोलन यशस्वी करन्या मधे शुरूवीर समता सैनिक दलाची फ़ार मोठी भूमिका होती, आज समता सैनिक दलाची गरज प्रत्येक गावामधे आहे. गाव तिथे शाखा घर तिथे सैनिक या तत्वावर मुख्यालय दिक्षाभूमि द्वारा आज सावळदबार येथे शाखा स्थापन करन्यात आली. मुख्य मार्गदर्शक म्हनुन समता सैनिक दल प्रमुख स्मिताताई कांबळे यांनी दलाचा शौर्यवान इतिहास आनी आजची आपलि जवाबदारी यावर सविस्तर मर्गदर्शन केले.विचार व्यक्त करताना त्यानी सांगीतले की समता सैनिक दल हे मातृसंघठन आहे,ह्या संघटनेच्या माध्यमातुन सर्व घटकासाठी मानवतावादी कार्य होऊन देश सेवा व देशात मौलिक विचार घट्ट रुजऊन समतेच संविधानिक राज्य प्रस्तापीत करन्याची नैतिक जवाबदारी दलाची आहे, वरिष्ठ अधिवक्ता आकाश मुन यानी संगितले की अन्याय अत्याचाराचा बिमोड करुन न्याय देनार आनी सर्वांचे अधिकार सुरक्षित करनार एकमेव संघटन समता सैनिक दल आहे.ह्या प्रसंगी अजय बागड़े सिधांत पाटिल यानी लाखों च्या संख्यानी दलामधे युवा वर्ग शामिल होन्याचे आव्हान केले. समता सैनिक दलाच कार्य पुढ़े नेन्यासाठी समता सैनिक दल मुख्यालय दिक्षाभूमि च्या माध्यमातुन आज दि. ७ नोवेंबर 2023 रोजी सावळदबारा येथे समता सैनिक दलाची शाखा स्थापना एड. स्मिताताई कांबळे एड.आकाश मुन अजय बांगडे सिद्धांत पाटील यांचा हस्ते बोर्ड चे उद्घाटन करण्यात आले त्यात मोलाचे सहकार्य प्रा. सुदाम जाधव सर. मनोहर जगताप. नंदकिशोर सुरडकर. समाधान जाधव. नामदेव सुरडकर भगवान जाधव दिलीप सुरडकर गोतम बनकर यांचे लाभले शाखा अध्यक्ष स्थानी आकाश भगवान जाधव,अजय विजय गायकवाड, सुमित प्रकाश सुरडकर, अजय विजय आगळे, अजय अशोक सुरडकर, प्रेम सुरेश भिवसणे, रवी प्रकाश सुरडकर,सागर मधुकर सुरडकर,भागवत गंगाराम जाधव, मिलिंद शेषराव बनकर, अल्केश प्रभाकर सुरडकर, नरेश सुरेश सुरडकर,आदी मान्यवरांचे मोलाचें सहकार्य लाभले यावेळी महिला, बालगोपाल, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे हाल; निर्वाह भत्त्यापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** राज्यातील समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहांमध्ये राहणारे विद्यार्थी २०२३ चे शैक्षणिक सत्र सुरू झाल्यापासून शासकीय सुविधांपासून वंचित आहेत. मागील तीन वर्षांपासून विद्यार्थ्यांना या सुविधा मिळत नसल्याची बाब काही विद्यार्थ्यांनी निदर्शनास आणूनही शासनस्तरावर उपाययोजना न झाल्याने विद्यार्थी खिशातून खर्च करत असल्याचे चित्र आहे. भोजन निविदा २०१४ पासून काढल्या नसल्यामुळे आणि जुने भोजनाचे दर ठेकेदारांना परवडत नसल्याने विद्यार्थ्यांना निकृष्ट भोजन मिळत असल्याची ओरड सुरू आहे. विद्यार्थ्यांना दुध, अंडी, फळं, नाश्ता असा सकस आहार देण्याचे नियोजन असताना समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांमध्ये निकषांप्रमाणे भोजन मिळत नसल्याची विद्यार्थ्यांची तक्रार आहे. निर्वाहभत्ता, ड्रेसकोड, स्टेशनरी यासाठी विभागाकडे निधी नसल्याने विद्यार्थी या सुविधांपासूनही वंचित आहेत. कोरोनानंतर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अद्यापही नवीन चादर, ब्लँकेट आदी साहित्याचा पुरवठा झालेला नाही. त्यामुळे ऐन थंडीच्या दिवसांत विद्यार्थ्यांना समस्यांचा सामना करावा लागत आहे.

विद्यार्थ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून वसतिगृहांमध्ये वॉटर कुलर बसविण्यात आले. मात्र त्यानंतर अनेक ठिकाणी त्याची देखभाल, दुरूस्ती न झाल्याने बहुतांश वॉटर कुलर धुळखात पडले आहेत. हीच स्थिती इन्वहर्टरच्या बाबतीत आहे. अनेक वसतिगृहात वीज पुरवठा खंडीत झाल्यास पर्याची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना अनेकदा अंधारात चाचपडत राहावे लागते. समाजकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश, छत्री, रेनकोट, लॅब ॲप्रन, प्रोजेक्ट रिपोर्ट व शैक्षणिक सहल यांची देयके थकीत असल्यामुळे विद्यार्थी या साहित्याच्या लाभापासूनही वंचित आहेत. समाजकल्याण विभागामार्फत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी दोन लाखांची पुस्तके खरेदी करण्याची तरतूद आहे. मात्र या पुस्तकांची खरेदीच होत नसल्याने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी पुस्तके उपलब्ध होत नाही. विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा काढणे बंधनकारक असताना अजूनपर्यंत विमा काढण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी व्यायामाची सुविधा व्हावी काही मोजक्याच वसतिगृहांमध्ये जिमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वसतिगृहांमध्ये टिव्ही संच, क्रीडा साहित्याचा पुरवठाही बंद आहे. विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्याटिमध्येसुद्धा अद्याप वाढ झालेली नाही.

पुसद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय वसतिगृहात इयत्ता अकरावीपासून राहून शिक्षण घेत असलेल्या सुधीर मुडुमडीगेला या विद्यार्थ्याने, गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये शासनाचे शासकीय वसतिगृहांकडे दुर्लक्ष होत असल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत असल्याकडे लक्ष वेधले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या समस्यांकडे लक्ष देवून विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी त्याने केली.

यवतमाळ येथील समाजकल्याण अधिकारी भाऊराव चव्हाण यांनी जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत १८ वसतिगृहे चालविली जात असल्याचे सांगितले. शासनाच्या निर्देशांप्रमाणे सर्वच वसतिगृहांमध्ये सुविधा पुरविल्या जात आहेत. निधीअभावी विद्यार्थ्यांचा निवार्ह भत्ता प्रलंबित आहे. स्पर्धा परीक्षेची पुस्तकेही उपलब्ध करून दिली जातात. नुकतीच सिव्हील सर्व्हिसेससंदर्भात पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली, अशी प्रतिक्रिया या समाजकल्याण अधिकारी चव्हाण यांनी दिली.

# नांदेडातील ६० बौद्ध उपासक उपासिका आजपासून श्रीलंका दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** चक्रवर्ती सम्राट अशोकाने बुद्धधम्माची दीक्षा घेतल्यानंतर भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला. देशभरात ८४ हजार स्तूप बांधले. आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत धम्मप्रचारास पाठवले. चक्रवर्ती राजा सम्राट अशोकाची सुकन्या संघमित्रा भिक्षुणीने बुद्धगयेच्या बोधीवृक्षाची शाखा (फांदी) अनुराधापूर, श्रीलंका येथे नेऊन लावली आणि बौद्ध धम्म प्रचार कार्याला प्रारंभ केला. आज श्रीलंका बौद्ध राष्ट्र म्हणून ओळखल्या जाते. जगातील सर्वात जास्त बौद्ध भिक्खूंची संख्या श्रीलंकेत आहे. अशा धम्मराष्ट्राचा अभ्यास करण्यासाठी येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो आणि ६० बौद्ध उपासक उपासिका यांचा जत्था नांदेड रेल्वेस्थानकावरुन श्रीलंकेकडे आज रवाना होणार आहे.

ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रामणेर प्रशिक्षण केंद्र खुरगाव नांदुसा यांच्या वतीने दरवर्षी बौद्ध राष्ट्रांचा अभ्यास दौरा आयोजित केला जातो. आज दि. ९ पासून नांदेड ते हैदराबाद आणि हैदराबाद ते चेन्नई असा रेल्वेप्रवास होणार असून चेन्नई येथून कोलंबो येथे विमानाने प्रस्थान होणार आहे. हा अभ्यासदौरा १८ नोव्हेंबरपर्यंत चालणार असून श्रीलंकेतील अनेक ऐतिहासिक बौद्ध स्थळांना भेटी दिल्या जाणार आहेत. तसेच १९ रोजी खुरगाव येथे धम्मसहलीवरुन परतलेल्या सर्व बौद्ध उपासक उपासिकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. आज ९ नोव्हेंबर रोजी हुजुर साहेब नांदेड रेल्वेस्थानकावरुन हजारोंच्या उपस्थितीत हा जत्था रेल्वेने रवाना होणार आहे.



# फुलवाला चौक येथील विस्फोटक फटाके विकणाऱ्या दुकानांवर कारवाई करा : युवासेना

## धुळे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शरतील अतिशय गजबजलेल्या ठिकाणी म्हणजे फुलवाला चौक, आग्रा रोडावर अत्यंत विस्फोटक पदार्थ तसेच ज्वलनशील फटाके विकले जातात याठिकाणी सर्व आजूबाजूला कापड दुकान, प्लास्टिक वस्तूचे दुकाने, इलेट्रॉनिक दुकाने आहेत तसेच सणासुदीच्या काळात या ठिकाणी पेठ भाग असल्यामुळे जिल्ह्याभरातून सर्व नागरिक या ठिकाणी बाजार करण्यासाठी येत असतात त्यातच या भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीही होत असते चेंगरा-चेंगरी चे प्रकारही या ठिकाणी होत असतात विस्फोटक पदार्थ व फटाकडे दुकानात जर काही ज्वलनशील पदार्थ मुळे काही झाले तर भविष्यात खूप मोठी जीवित व वित्तहानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही असा आरोप या निवेदनाद्वारे करण्यात आला.

सध्याच माननीय न्यायालय यांनी निर्देशित केल्या नुसार विस्फोटक पदार्थ व ज्वलनशील पदार्थ हे खुल्या जागीच विकली जावी असे निर्देश दिलेले आहे याचे कोणतेही पालन या ठिकाणी होताना दिसत नाही तसेच आग विझवण्यासाठी,रोखण्यासाठी शासनाने काही दिशादर्शक,निर्देश, अग्निशामक यंत्रणा आहेत ते येथे कोठोच दिसत नाही.जेणेकरुन काही दुर्घटना झाली की ती तात्काळ निवळता यावी पण याठिकाणी अशी काहीच वेवस्था नाही आणि प्रमाणापेक्षा जास्त दारूगोळा साठा फटके आहे.आणि त्यात मर्यादा पेक्षा जास्त ध्वनी असलेले ही फाटके विक्री साठी असून आपण यावर तत्काळ कारवाही करावी तसेच येथील दुकानांची आपल्या स्तरावर योग्य ती चौकशी करून त्यांना सील लावण्यात यावी जेणेकरून पुढील अनर्थ टळेल असे महानगर प्रमुख सिद्धार्थ करंकाळ यांनी सांगितले.

सदर निवेदन देतांना जिल्हाप्रमुख हरीश माळी, उपजिल्हाप्रमुख कोणाला कानकाटे, महानगर प्रमुख सिद्धार्थ कारंकाळ, महानगर प्रमुख मनोज जाधव, जयेश सोनवणे,किशोर साळुंके,जयेश फुलपगारे,समर्थ मुर्तडक,शुभम फुलपगारे आदी युवा सेना पदाधिकारी व युवा सैनिक उपस्थित होते.



# दुर्गापूर कार्यालयाला उलगुलानचा घेराव

## मृत बालकाच्या कुटुंबाला मिळवून दिली आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरालगत असलेल्या दुर्गापूर येथील वेकोलीच्या फिल्टर प्लांट येथे पोहायला गेलेल्या 12 वर्षीय बालकाचा मंगळवारी पाण्यात बुडून मृत्यू झाला. प्रेम वाघमारे असे मृतकाचे नाव आहे. याची माहिती उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर वेकोलीच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत आर्थिक नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली. मात्र नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ करणाऱ्या वेकोलीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालत त्यांना कार्यालयात डांबून ठेवले. त्यानंतर मुख्य महाप्रबंधक, कार्मिक अधिकाऱ्यांनी मृतकाच्या कुटुंबियांना 25 लाखांची आर्थिक मदत देण्याचे मान्य केले.

मंगळवारी परिसरातील काही मुले वेकोलीच्या फिल्टर प्लांट येथे पोहायला गेले होते. मात्र प्रेम वाघमारे याचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यानंतर वेकोली कार्यालयात चांगलंच गोंधळ उडाला. राजू झोडे व के. के. सिंग यांनी तत्काळ आर्थिक मदतीची मागणी केली. त्यानंतर ही मागणी रात्री उशिरा मान्य करण्यात आली. उपस्थित अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिले. यावेळी पोलीस अधिकारी, वेकोली अधिकारी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी आंदोलनात के के सिंग, राजु झोडे रविन्द्र मोटगरे, सुनिल बैरेकर, सचिन मांदाने, श्यामभाऊ झिलपे, आशिफ पठान, गुरु भगत, रवि पवार, आनंद इंगडे, रामभाऊ आदी नागरिक उपस्थित होते.



# वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे शेतकरी हतबल

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय घाट्याचा व बिनभरवशाचाच झाला आहे. त्यात दररोज हरिण, रानडुक्कर, रोही ही कपाशी पिकाची मोठ्या प्रमाणात नासधूस करून भर घालत आहे. दिवसेंदिवस डुकरांची संख्या वाढत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. येथील परिसरात अत्यल्प भूधारक गरीब शेतकऱ्यांच्या शेतातील कपाशी पिकांची पिकांची रानडुकराच्या कळपाकडून मोठ्या प्रमाणात नासाडी करण्यात येत जंगला लगतच्याच नव्हे तर आता असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान गावाला लागून असलेल्या शेतात सुद्धा होत आहे. डोळ्यादेखत उभे पीक रानडुकराचा उपद्रव वाढला असून पायाखाली तुडविले जात असून वन्य जीवांचे कायदे अस्तित्वात असल्यामुळे त्यांना ठार मारण्यासाठी शेतकऱ्यांना कोणतीही परवानगी मिळत नसल्यामुळे या डुकरांच्या कळपांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. परिणामतःया रानडुकराचा बंदोबस्त कसा करायचा या चिंतेत शेतकरी दिसून येत आहे. जंगलातील वन्य जीवांच्या राहण्याची व खाण्यापिण्याची कोणतीही व्यवस्था वनविभागाकडून व शासनाकडून करण्यात येत नसल्यामुळे हे वन्यप्राणी जंगलातून बाहेर पडून शेतकऱ्यांच्या उभ्या पिकावर तुटून पडतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात कुठलेच पीक लागत नसून यात गरीब शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. जंगला लगत नव्हे तर आता गावाला लागून असलेल्या शेतात सुध्दा रानडुक्कराचा उपद्रव वाढला असून हे पिकाचे नुकसान करीत आहेत. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती हंगाम शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी व जीवघेणा ठरत असताना त्यात रानडुकराचे कळप शेतकऱ्यांच्या चारठाणा, हानवतखेडा, ब्राम्हणगाव, सावरगाव, मोहाडी,वाडी, जाभरुण, मोठा, दगडचोप, यांच्यासह अनेक परीसरातील ऊभ्या असलेल्या पिकावर डल्ला मारून उभ्या पिकांची वन्य प्राणी नासधूस करून खराब करीत आहेत. अनेकवेळा या रानडुक्कर, रोही, हरिण या सर्व वन्य प्राण्याचा बंदोबस्त करावा तसेच या वन्य जीव, प्राण्याना अभय अरण्य, खाणपाणची सोय करावी, असे नसल्याने, वन्य प्राणी शेतकऱ्यांची शेतातील पिकाची नासधूस करून खराब करीत या लवकर लवकर बंदोबस्त करावेत अशी शेतकऱ्यांची मागणी होत आहेत.



## अत्याचार : आरोपीस २० वर्षे सश्रम कारावास

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** एका बालिकेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्रमांक २) ए. एस. काझी यांच्या न्यायालयाने मंगळवारी २० वर्षे सश्रम कारावास, २० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. ही घटना ४ फेब्रुवारी २०२१ रोजी तिवसा ठाण्याच्या हद्दीतील घडली होती.
विठ्ठल रामजी कामठे (३५) रा. तारखेडा, तिवसा असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयात दाखल दोषारोपपत्रानुसार, विठ्ठल हा पीडित १२ वर्षीय बालिकेच्या वडिलांचा मित्र असल्याने त्याचे त्यांच्याकडे येणे-जाणे होते. घटनेच्या दिवशी ४ फेब्रुवारी २०२१ रोजी विठ्ठल हा दुचाकीने त्यांच्याकडे आला. त्याने पीडित बालिकेला आवाज देऊन आपल्यासोबत बाहेर नेले. मात्र, त्याने रात्रभर पीडित मुलीला घरी न आणल्यामुळे दुसऱ्या दिवशी ५ फेब्रुवारी २०२१ रोजी तिच्या आईने तिवसा ठाण्यात तक्रार दाखल केली. दरम्यान, दुसऱ्या दिवशी सकाळी विठ्ठलने पीडित बालिकेला तिच्या घराजवळ आणून सोडून दिले. पीडित बालिका घरी परतल्यावर तिची चौकशी करण्यात आली. विठ्ठल हा आपल्याला एका शेतात घेऊन गेला. तेथे त्याने आपल्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यापूर्वीही त्याने आपल्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याचे पीडित बालिकेने यावेळी सांगितले. या प्रकरणी पीडित बालिकेच्या आईने तिवसा ठाण्यात तक्रार दाखल केली.

## गणपती हॉस्पिटलमधील महिलेच्या मृत्यूप्रकरणी डॉ. गाडेकरवर गुन्हा दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाथ्री येथील कलाबाई दादाराव धुमाळ यांना शहरातील गणपती हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी दाखल केले होते. परंतु संबंधित डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे कलाबाई दादाराव धुमाळ यांचा मृत्यू झाला.
म्हणून या प्रकरणी औरंगाबाद विभागीय आयुक्त , औरंगाबाद जिल्हाधिकारी, औरंगाबाद जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या कडे आपल्या मागण्यांची तक्रार देण्यात आली. तसेच दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, तालुक्यातील पाथ्री येथील कलाबाई दादाराव धुमाळ यांना आम्ही गणपती हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी दाखल केले होते, तसेच डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की आम्ही उपचार करतो असे सांगून पेशंटला आयसीयुत नेले व त्यांच्या कोणताही उपचार न करता फक्त त्यांना दाखल करण्यात आले. व त्यांच्या एका तासानंतर सांगितले की, तीन हजार रुपये जमा करा.व तुमचे पेशंट न्या. शिवाय कोणीच इथे येऊ नये. त्यानंतर पैसे जमा करा नंतर उपचार करतो असे सांगून दिले. तरी पण संबंधित डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे या महिलेचा मृत्यू झाला. म्हणून या करिता या प्रकरणी गणपती हॉस्पिटल मधील डॉक्टर गाडेकर यांच्या वर गुन्हा दाखल करावा व परवाना रद्द करा.चौकशी करून कारवाई करण्यात यावी. नसता पाथ्री येथील गावकऱ्यांच्या वतीने औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालय समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुका सचिव अजय पगारे, दलित पँथरचे ऋषिकेश सुरडकर यांच्या सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## संत सावता माळी महाविद्यालय येथे बॉक्सिंग स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील संत सावता माळी महाविद्यालय येथे बॉक्सिंग स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण काल दिनांक ६ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा २०२३ च्या बक्षीस वितरण समारंभात बक्षीस वितरण करताना भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, श्री. भगवान भाऊ निराशे, प्राचार्य श्री. डॉ. टकले सर, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप, डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. महेश थोरात, श्री. प्रेम चव्हाण व पदक विजेते खेळाडू आणि त्यांचे प्रशिक्षक उपस्थित होते.



## आला आला पोतराज, द्यावा एक पैसा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** बाई बाई तुमचं लेण काई...पांढराच पंखा हिरवी खण चोळी. लिंबाचं नेसण अन गाड्यावर बसण ...बोला डोंगरावरच्या आईचं चांगभलं गावोगावी पोतराजची आरोळी कानावर पुर्वी कायम कानावर पडत राहायची. बारा बलुतेदारमधील 'पोतराज'ची उपासमार मात्र आता होऊ लागलेली आता दिसते. वितभर पोटाच्या खळग्याला खायला लागत म्हणून पोट भरण्यासाठी गावातल्या पोतराजनी आपला मोर्चा दिवाळी सणात औचित्य साधून चारठाणा शहराकडे वळलेला दिसतो. पोतराज स्वतःला आसूड मारून घेत भिक्षा मागत असताना आता तुरळक दिसतात. समाजातल्या शेवटच्या घटकातील पोतराज'ची पुन्हा सोसेहाल सुरू झाले. रंगाच्या वेशभूषा मुळे लक्ष वेधून ठरतात पोतराज गावोगावी फिरून आपली गुजराण करणारे पोतराजची संख्या कमी होत असली तरी आणखीन ही ग्रामीण भागात , मोठ मोठ्या शहराकडे जाणाऱ्या मार्गावरील सिंगलवर स्त्री वेषात , कंबरेभोवती हिरव्या खणांचा घागरा, कंबरेचा वरचा भाग उघडा, राखलेल्या मिशा, स्त्रियांप्रमाने वाढलेला केसांचा अंबाडा, कपाळावर हळदी कुंकवाचा मळवट, त्याच्या पत्नीच्या हातात डोंबारी , ड मरीआई चा देव्हारा, मोरपिसाचा कुंचा , अशी वेशभूषा असणारा पोतराज सर्वांचे लक्ष वेधून घेतात.

## टिटोली शिवारात बिबट मादी जेरबंद

### कामगार वर्गात भीतीचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील गोंदे दुमाला येथील औद्योगिक वसाहतीतील सिजारे बोनेटी इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. त्यामुळे वसाहतीत भीतीचे वातावरण पसरले आहे. वनपरिक्षेत्र विभागाने तत्काळ पिंजरा लावावा अशी मागणी राजू जाधव यांनी केली आहे. गेल्या आठ दिवसापासून कंपनीमध्ये सतत बिबट्या निदर्शनास येत असून याविषयी कंपनीचे सेक्युरिटी गार्ड यांनी वेळोवेळी माहिती दिली आहे. रात्री नऊ ते दहा वाजेनंतर बिबट्या हा कंपनीच्या परिसरात फिरत असतो यामुळे कंपनी कामगारांमध्ये व सेक्युरिटी गार्ड आणि कामगारांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. याविषयी कंपनीचे एच आर मॅनेजर तुषार दासणुर यांनी कंपनीमध्ये लावलेले सि सी टीव्ही फुटेज चेक केले व यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे दोन ते तीन वेगवेगळे बिबटे निदर्शनास आले कदाचित याकडे जर दुर्लक्ष केलं तर जीवित हानी होण्याची शक्यता आहे.. यासंदर्भात फॉरेस्ट अधिकारी एस के चौधरी व कावेरी पाटील यांना माहिती मिळताच कंपनीचे एच आर मॅनेजर तुषार दासनूर व फॉरेस्ट अधिकारी यांनी घटनास्थळी पूर्ण परिसरात व या संदर्भात वरिष्ठ अधिकारी यांनी यावर तात्काळ उपाय करण्यासाठी वरिष्ठांची बोलणी केली व इथे कुठलाही अनर्थ होणार नाही याची काळजी घेतली व कंपनीतील सर्व कामगारांना निडर राहण्यासाठी मार्गदर्शन केले .. लवकरात लवकर बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात येईल असे सांगण्यात आले आहे.
दरम्यान तालुक्यात सध्या भात सोंगनी हंगाम सुरु असून शेतशिवार मोकळे होत असल्याने जंगली जनावरे नागरी वस्तीत येवू लागले आहे. अस्वली स्टेशन, जानोरी मळे विभाग, नांदुर वैद्य तसेच तालुक्यात ग्रामीण भागात अजूनही बिबट वाघ आहेत.



इगतपुरी शाहरानजीक असलेल्या टिटोली गावच्या शिवारात मंगळवारी मध्यरात्री वनविभागाने लावलेल्या पिंजरयात एक बिबट मादी अलगद जेरबंद झाली आहे . या वाघिनीने परिसरातील वासरे, कोंबडया, कुत्री तसेच अनेक बक–या फस्त केल्या असून त्यामुळे संपूर्ण टिटोली गाव दहशती खाली वावरत होते . मध्यरात्री बिबट मादी पिंज–यात अडकल्याची माहिती उपसरपंच अनिल भोपे यांनी वनविभागला दिली . सकाळी ही खबर गावांत व परिसरात पसरताच वाघीनीला बघायला लहान मोठ्या नागरिकांनी एकच गर्दी केली होती . सकाळी वनविभागणे पिंजरा व मादी ताब्यात घेतले . ग्रामपंचायतीच्या वतीने पत्रव्यवहार करून पिंजरा लावण्याची मागणी वनविभागाकडे करण्यात आली होती .

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# अजित पवारांनी घेतलेल्या निर्णयाला ही सलामी : तटकरे

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** अजितदादांच्या नेतृत्वाखाली राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये साडेपाचशे पेक्षा जास्त ग्रामपंचायतींवर झेंडा फडकला आहे माझ्या मते जनतेने अजितदादा पवार यांनी घेतलेल्या निर्णयाला ही सलामी दिली आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला जनतेने दिलेल्या पाठिंब्याबद्दल मत व्यक्त केले. घड्याळ तेच वेळ नवी, निर्धार नवपर्वाचा या अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील शेवटचा दिवस असून वर्धा येथे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. पक्ष संघटनेची बांधणी करावी आणि अजितदादांनी घेतलेल्या निर्णयाची कारणमीमांसा सांगणे, देशात व राज्यात एकविचाराचे सरकार असावे हे सांगण्यासाठी 'घड्याळ तेच वेळ नवी,' निर्धार नवपर्वाचा' हे अभियान सुरू करण्यात आले आहे. अस्थिरता निर्माण होते तेव्हा भिन्न विचारसरणीचे पक्ष एकत्र येतात. मात्र आम्ही काहीतरी वेगळे केले आहे हे भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे म्हणून हे अभियान सुरू केले असल्याचे सुनिल तटकरे म्हणाले. यंत्रणांच्या भीतीने आम्ही भाजपसोबत गेलो असा जाणीवपूर्वक आभास निर्माण केला गेला तो निखालस खोटा आहे. २०१४ मध्ये भाजपने पाठिंबा मागितला नव्हता परंतु तरीही आम्ही पाठिंबा जाहीर केला होता. ज्या काँग्रेसने बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला नेहमी विरोध केला त्याच ठाकरेंच्या शिवसेनेला काँग्रेसने सत्तेत पाठिंबा दिला होता हेही सुनिल तटकरे यांनी सांगितले. गुवाहाटीला एकनाथ



शिंदे गेल्यावर सत्तेत अस्थिरता निर्माण झाल्याने आमच्या पक्षाच्या सर्व आमदारांनी पवारसाहेबांना पत्र लिहून भाजपसोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि त्या पत्रावर सर्वांच्या सहया आहेत. मात्र तो निर्णय झाला नाही असेही सुनिल तटकरे म्हणाले. राज्यात नवीन कार्यकर्त्यांची फळी अजितदादांच्या व प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वाखाली तयार होताना दिसत आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले. ब्रिटिशांना 'चले जाव' चा नारा देणाऱ्या महात्मा गांधी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सेवाग्राम आश्रमाला आज भेट दिली. यावेळी त्या काळात महात्मा गांधीजी कसे रहात होते आणि स्वातंत्र काळात चळवळी इथून कशा घडल्या याची माहिती घेतल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर,माजी मंत्री सुबोध मोहिते, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम आदी उपस्थित होते.



# नवनियुक्त सरपंच, सदस्यांचा काँग्रेसतर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** चिखली तालुक्यातील अंबाशी येथे दिनांक ६ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत ची निवडणूक पार पडली यामध्ये अंबाशी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक शेख वहीद शेख हमीद सरपंचपदी व इम्रान खान पठाण यांची सदस्य पदी यांची प्रचंड बहुमतांनी निवडून आल्याबद्दल लोणार शहर काँग्रेस कमिटी व बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने ग्राम अंबाशी येथे दिनांक ६ नोव्हेंबर संध्याकाळी सात वाजता सत्कार करण्यात आला. यावेळी लोणार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद, युवक काँग्रेस जिल्हाधक्ष अनिकेत मापारी, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे, शेख अजहर यांनी नियुक्त सरपंच शेख वहीद, ग्रामपंचायत सदस्य इमरान खान पठाण, शेख हबीब भाई, सूर्यप्रकाश गायकवाड प्रताप गवई, संतोष पवार, संतोष पाझडे, पंजाब खंडागळे, संतोष देशमुख, प्रदीप देशमुख इत्यादी नवनियुक्त सदस्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन फटाक्याच्या अतिष बाजीने भव्य सत्कार केला. याप्रसंगी जावेद शेख, माजी सरपंच हरून सेठ, शिवानंद गायकवाड, रोशन खा पठाण, गुलशेर खा पठाण, मस्तान कुरेशी, इनयात खा पठाण, हसन कुरेशी, फयाज खा, शम्मू पठाण, शेख मुरसलिम, शेख जाकीर, सै.बशीर, सै.असद, शेख ईसा, शेख नासिर आदि उपस्थित होते.


# कोपर्डे येथे आरंभ व्याख्यानमालेचे आयोजन

## संभाजी भिडे, विलास शिंदे, भरत शिंदे यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** दिवाळीच्या दरम्यान नवे पर्व युवा सर्व असे म्हणत कोपर्डे ता.खंडाळा येथे आरंभ व्याख्यानमाला २०२३ चे आयोजन करण्यात आलेले असून ही व्याख्यानमाला शुक्रवार दि.१० नोव्हेंबर ते रविवार दि.१२ नोव्हेंबर या कालावधीत संपन्न करण्यात येणार आहे, अशी माहिती जगन्नाथ शिंदे यांनी दिली.या व्याख्यान मालेचे पहिले पुष्प शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक अध्यक्ष व शिवतपस्वी संभाजी भिडे गुरुजी हे शुक्रवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ८.३० वाजता गुंफणार आहेत. प्रतापगड रणसंग्राम या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यान मालेचे उदघाटक म्हणून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी उपस्थित राहणार आहेत.शनिवार दिनांक ११ नोव्हेंबर रोजी नाशिक येथील हेलिकॉप्टर मध्ये फिरणारा शेतकरी विलास शिंदे हे शेती नाही तोट्यात या विषयावर व्याख्यान देणार आहेत.





यावेळी साताऱ्यातचे एस पी समीर शेख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. रविवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी चांडाळ चौकटी करामती भरत शिंदे (बाळासाहेब) यांचे व्याख्यान माझा जिवनप्रवास यावर होणार आहे.यावेळी ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी (ए सी पी) यांची उपस्थिती असणार आहे.कोपर्डे गावाला व्याख्यानाची परंपरा आहे.
कोपर्डे गावातील तरुण निर्व्यसनी राहावेत.मोबाईल पासून दूर व्हावा. तसेच गुणवंतांचा कौतुक सोहळा व्हावा.या उद्देशाने कोपर्डे गावात व्याख्यामाला असते. या आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान मालेस सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जगन्नाथ शिंदे यांच्या कडून करण्यात आलेले आहे.



# शिरवळच्या ग्लोरी इंग्लिश स्कूल येथे क्रीडा महोत्सव संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शिरवळ, ता. खंडाळा येथील ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये दि.६ नोव्हेंबर पासून क्रीडा महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र भणगे व उप मुख्याध्यापक वैशाली भणगे यांच्या हस्ते क्रीडांगण मैदानाचे पूजन करण्यात आले.या वेळी विद्यार्थी व शिक्षक शिक्षिका वृंद उपस्थित होते.या क्रिडा महोत्सवात नर्सरी पासून ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी शाळेच्या उप शिक्षिका विद्या भारती यांनी खेळाचे महत्त्व विद्यार्थ्यांना त्यांच्या मनोगतातून सांगितले.
क्रीडा शिक्षक किरण खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डी, क्रिकेट,व्हॉलीबॉल, रिले, १०० मीटर धावणे यासारख्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शितल भणगे, संतोष पवार, सोनल बर्गे, ज्योती लोखंडे, अर्चना गायकवाड, वैशाली खोपडे, जया देमसे, हेमा दिक्षित, सविता कांबळे, दिपाली पवार, दिपाली कुंभार, अर्चना कांबळे, वर्षा शिंदे, सोनाली बोराटे हे सगळेजण विशेष परिश्रम घेत आहेत. शाळेत होत असलेल्या वेगवेगळ्या स्पर्धांचे कर्णधार हे अर्जुन चव्हाण, समशेर अन्सारी, युवराज राठोड,मंथन कदम, ओंकार कांबळे, प्रज्वल देशमुख,मेहबूब शेख, आयशू राठोड, आफ्रिन तांबोळी, तिलोत्तमा जाधव, अनुजा बोबाटे, सिध्दी मांढरे, सिद्धी साळुंखे, सृष्टी मगर हे आहेत. या सर्वांनी आपली कामगिरी अचूकपणे निभावली. शालेय जीवनात क्रीडा महोत्सव हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचा असून यात सहभागी होत विद्यार्थ्यांना मोठया जिद्दीने खेळत असतात. विद्यार्थ्यांनी हा क्रिडा महोत्सव चांगल्या प्रकारे यशस्वी केला.विद्यार्थी यांच्या सहभागाने आणि शिक्षकवृंद यांच्या सहकार्याने हा क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आल्याने शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र भणगे व उप मुख्याध्यापक वैशाली भणगे यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

# रेल्वेगाडीत फटाके आणणाऱ्यांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** रेल्वेगाडी ज्वलनशील पदार्थ, वस्तू नेण्यास मनाई असताना फटाके घेऊन प्रवास करणाऱ्या ११ जणांविरुद्ध रेल्वे सुरक्षा दलाच्या पथकाने कारवाई केली.
ज्वलनशील वस्तू रेल्वेगाडीतून प्रवास करणाऱ्यांना भारतीय रेल्वे कायद्याच्या कलम १६४ अंतर्गत कारवाई करण्यात येते. संबंधितांवर एक हजार रुपयांचे दंड किंवा तीन वर्षांचा तरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे.
फटाके प्रतिबंधित वस्तू आहे. त्यामुळे दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलाच्या पथकाने दिवाळी तोंडावर विशेष तपास मोहीम हाती घेतली आहे. यावेळी वेगवेगळ्या रेल्वेगाड्यांमधून प्रवास करणाऱ्या ११ जणांना फटाके बाळगल्याबद्दल कारवाई करण्यात आली.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in